रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १८ ◆ अंक ३१९
www.ramprahar.com
◆ रविवार, ७ जून २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

शिवराज्याभिषेकाहून परतताना एकाचा मृत्यू/२
रविप्रहरमध्ये विविध विषयांवर लेख/४
भारताच्या प्रज्ञानंदने रचला इतिहास!/८

## आनंदवार्ता! मान्सून तळकोकणात धडकला



**दोडामार्ग :** राज्यातील बळीराजासह नागरिकांची प्रतीक्षा अखेर संपली असून मान्सूनने शनिवारी (दि.६) तळकोकणातून महाराष्ट्रात प्रवेश केला. यंदा सरासरी वेळेच्या तीन दिवस उशिरा म्हणजेच ४ जून रोजी मोसमी वारे केरळमध्ये दाखल झाले. त्यांनतर मोसमी वाऱ्यांची वाटचाल वेगाने उत्तरेच्या दिशेने होऊन ५ जूनला कर्नाटक, तामिळनाडू तसेच नैऋत्य बंगालच्या उपसागराच्या आणखी काही भागांमध्ये पुढे सरकल्याची माहिती हवामान विभागाने दिली. मान्सूनने अरबी समुद्राच्या आणखी काही भागांसह गोव्यातील काही भागांतही प्रवेश केला होता. त्यामुळे राज्यात लवकरच मान्सून दाखल होण्याचा अंदाज व्यक्त केला जात होता. त्यानुसार मोसमी वाऱ्यांनी शनिवारी संपूर्ण गोवा प्रदेश व्यापला असून महाराष्ट्रातील तळकोकणात हजेरी लावली आहे. राज्यातील उर्वरित भागातही लवकरच मान्सून दाखल होईल, असा अंदाज व्यक्त केला जात आहे.

# नवी मुंबई विमानतळाला 'दिबां'चेच नाव दिले जावे यासाठी आम्ही आग्रही -मुख्यमंत्री

## ■ छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला लोकनेते स्व. दि.बा. पाटील यांचेच नाव दिले गेले पाहिजे हा आमचा आग्रह आहे. यासंदर्भात आम्ही कार्यवाही पूर्ण केली असून केंद्र सरकारकडे पाठपुरावा चालू आहे. आम्ही तो पाठपुरावा करून नक्की हे नामकरण करून घेऊ, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शनिवारी (दि.६) व्यक्त केला.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या टर्मिनल १वर छत्रपती शिवाजी महाराजांच्या भव्य पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शिवराज्याभिषेक दिनाचे औचित्य साधून अत्यंत उत्साहात झाले. त्यावेळी ते बोलत होते.

या सोहळ्यास राज्याचे वनमंत्री गणेश नाईक, महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी, स्व. दि.बा. पाटील यांचे पुत्र अतुल पाटील, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, जिल्हा परिषद सदस्य निकिता खारकर, विभागीय आयुक्त रुबल अग्रवाल, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक शंतनू गोयल, पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचे व्यवस्थापक यांच्यासह इतर वरिष्ठ अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते.

विमानतळावर उभारण्यात आलेल्या शिवछत्रपतींच्या या स्मारकाचे महत्त्व अधोरेखित करताना मुख्यमंत्री म्हणाले की, हे विमानतळ रायगड जिल्ह्यात आहे, जिथे स्वराज्याची राजधानी किल्ले रायगड स्थित आहे. म्हणूनच या ठिकाणी महाराजांचे भव्य स्मारक असावे, अशी आमची इच्छा होती. आता देश-विदेशातून या विमानतळावर येणाऱ्या आणि येथून प्रवास करणाऱ्या प्रत्येक नागरिकाला शिवरायांच्या या तेजस्वी रूपामधून अथांग प्रेरणा आणि ऊर्जा मिळेल.

नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रा.लि.द्वारे विकसित करण्यात आलेल्या या स्मारकामध्ये आठ फुटांच्या भव्य चबूतऱ्यावर शिवरायांचा १२ फुटांचा कांस्य धातूचा अर्धपुतळा बसवण्यात आला आहे. नवी मुंबईतील 'आकार आर्ट अँड स्कल्पचर'चे शिल्पकार नितीन गोर्डे यांनी हा पुतळा साकारला असून महाराष्ट्र शासनाच्या कला संचालनालयाने मान्यता दिलेल्या प्रारूपावर आधारित कॉपर अलॉय ब्रॉन्झ (तांबेमिश्रित कांस्य)मध्ये याची निर्मिती करण्यात आली आहे. सुमारे आठ महिन्यांपेक्षा जास्त कालावधीत पूर्ण झालेली ही वैशिष्ट्यपूर्ण कलाकृती नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरातील एक प्रमुख आकर्षण ठरणार आहे तसेच विमानतळावर येणाऱ्या देशी-विदेशी प्रवाशांसाठी आणि अभ्यागतांसाठी हे स्थान सांस्कृतिक महत्त्वाचे एक मुख्य केंद्र ठरणार आहे.

# देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याच्या प्रारूपाला स्थगिती

**नागपूर : प्रतिनिधी**

राज्यातील देवस्थाने आणि मंदिरांच्या मालकीच्या भूखंडांबाबत राज्य सरकारने तयार केलेल्या महाराष्ट्र देवस्थान इनाम निर्मूलन कायद्याच्या प्रारूपाला स्थगिती देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंदिरांच्या जमिनींचे हक्क आबाधित राखण्यासाठी आणि या वादावर सर्वसमावेशक तोडगा काढण्यासाठी हिवाळी अधिवेशनात नवा कायदा आणला जाईल, अशी घोषणा राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी शनिवारी (दि.६) केली.

राज्यातील देवस्थान जमिनींचा वर्षानुवर्षे रेंगाळलेला प्रश्न सोडवण्यासाठी आणि त्यावर पारदर्शक कायदेशीर चौकट निर्माण करण्यासाठी शासनाने हे पाऊल उचलले होते, मात्र देवस्थानांच्या अधिकारांवर गदा येईल, अशी भीती व्यक्त करत विविध धार्मिक व सामाजिक संस्थांनी याला विरोध केला होता. या पार्श्वभूमीवर महसूलमंत्री बावनकुळे म्हणाले की, देवस्थानांच्या जमिनींचा



वापर स्वतः देवस्थानाला करता येत नसल्याने त्या जमिनी पुन्हा मंदिरांच्या स्वाधीन करणे आणि त्यांचे हक्क प्रस्थापित करणे हाच सरकारचा मुख्य हेतू होता, परंतु या कायद्याच्या मसुद्यावर आलेले आक्षेप अतिशय व्यापक असल्याने सद्यस्थितीतील प्रारूप तूर्तास स्थगित करण्यात आले आहे.

ज्या जमिनी गेल्या १०० ते २०० वर्षांपासून देवस्थानच्या ताब्यात नसून प्रत्यक्ष वहिवाटीखाली आहेत किंवा कुळात आहेत, त्यांचा प्रश्न स्वतंत्रपणे हाताळावा लागेल तसेच ज्या जमिनी थेट देवस्थानला परत मिळणे शक्य आहे, त्या सरसकट मंदिरांच्या स्वाधीन केल्या जातील, परंतु ज्या देवस्थानच्या जमिनी कालांतराने खासगी लोकांच्या मालकीच्या झाल्या आहेत, तिथे मूळ देवस्थानचे कायदेशीर हक्क कसे आबाधित राखता येतील याचा सखोल अभ्यास नव्या कायद्यात केला जाणार आहे.

### हिवाळी अधिवेशनात नवा कायदा

पश्चिम महाराष्ट्र आणि कोकण विभागासह संपूर्ण राज्यातील साडेचार लाख हेक्टर देवस्थान इनाम जमिनींचा तिढा सोडवण्यासाठी सरकार सकारात्मक आहे. त्यामुळे घाईघाईने कोणताही निर्णय न घेता येत्या डिसेंबरमधील हिवाळी अधिवेशनात सर्व घटकांना न्याय देणारा आणि देवस्थानांचे संरक्षण करणारा नवा कायदा आणला जाईल, अशी ग्वाही महसूलमंत्री बावनकुळे यांनी दिली. महाराष्ट्राची धार्मिक संस्कृती आणि देवस्थानांचे हित लक्षात घेऊनच या नव्या कायद्याचा मसुदा तयार केला जाईल, असेही महसूलमंत्र्यांनी स्पष्ट केले.

## आगरी सेनेचे प्रमुख राजाराम साळवी यांचे निधन

**ठाणे : प्रतिनिधी**



आगरी समाजाच्या संघटनात्मक चळवळीला दिशा देणारे, आगरी सेनेचे संस्थापक राजाराम साळवी यांचे शनिवारी (दि.६) सायंकाळी निधन झाले. त्यांनी वयाच्या ८३व्या वर्षी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या जाण्याने ठाणे परिसरात शोककळा पसरली आहे.

ठाण्यातील कळव्यात मनीषानगर येथे राहणारे राजाराम साळवी यांनी १ ऑगस्ट १९८६ रोजी आगरी सेनेची स्थापना केली. या संघटनेच्या माध्यमातून त्यांनी विखुरलेल्या आगरी समाजाला संघटित करण्याचे काम केले. याचबरोबर आगरी तसेच ओबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी त्यांनी आक्रमक भूमिका घेत अनेक आंदोलनेही उभारली होती. त्यांच्या पार्थिवावर रविवारी अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत.

## निवडक

### 'सीजेपीचे आंदोलन अराजकता पसरवण्याची मानसिकता'

**मुंबई :** कॉकरोच जनता पक्षाने (सीजेपी) दिल्लीतील जंतरमंतर येथे शनिवारी (दि.६) आंदोलन केले. यावेळी सीजेपीचे संस्थापक अभिजित दीपके यांनी शिक्षणमंत्र्यांच्या राजीनाम्याची मागणी केली. या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ही भारतीय तरुणांची अभिव्यक्ती नाही, तर अराजकता पसरवण्याची मानसिकता असल्याचे म्हटले. पुढे बोलताना त्यांनी आंदोलन करणाऱ्यांचे अराजकतावादी चेहरे आणि मनसुबे उघडे पडले आहेत. असे इरादे कधीही यशस्वी होणार नाहीत तसेच त्यांना कुठलेही समर्थन मिळालेले नाही, असा दावाही केला.

### १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीची अखेर टीम इंडियात एन्ट्री!

**नवी दिल्ली :** आयर्लंड आणि इंग्लंड मालिकेसह आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी बीसीसीआयने शनिवारी (दि.६) भारतीय टी-२० संघाची घोषणा केली. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली नव्या पर्वाची सुरुवात करताना निवडकर्त्यांनी आयपीएल हंगाम गाजवणाऱ्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीला तिन्ही संघांत स्थान दिले आहे. सर्वांत कमी वयात भारतीय संघात निवड होण्याचा विक्रम आता त्याच्या नावे झाला आहे. **(पान ८ वर..)**

## माथेरानमध्ये आल्हाददायक वातावरणात पर्यटनाला बहर



**माथेरान : प्रतिनिधी**

शाळांच्या सुट्ट्या संपत आल्या असून पर्यटन हंगामाच्या अखेरच्या टप्प्यात निसर्गरम्य माथेरानमध्ये पर्यटकांची गर्दी उसळली आहे. थंडगार वारा, सकाळी धुक्याची हलकी चादर, घोड्यावरची रपेट यामुळे पर्यटक अक्षरशः भारावून जात असून संपूर्ण परिसर उत्साही पर्यटकांनी फुलून गेला आहे.

शहरातील उकाड्यापासून दिलासा मिळवण्यासाठी अनेक कुटुंबांनी माथेरान पर्यटनस्थळाला पसंती दिली आहे. मुंबई, पुणे तसेच गुजरातमधूनही पर्यटक येथे दाखल झाले आहेत. विशेषतः सकाळी आणि सायंकाळी वाहणारा थंड वारा पर्यटकांना सुखद अनुभव देत असून येथील प्रसिद्ध एको पॉइंट आणि शारलोट तलाव पर्यटकांचे मुख्य आकर्षण ठरत आहे. येथे घोडेसफारीचा आनंद घेण्यासाठीही पर्यटकांची मोठी गर्दी होत असून पर्यटक निसर्गाचा मनमुराद आनंद लुटताना दिसत आहेत.

हिरवाईने नटलेले डोंगर, दऱ्याखोऱ्यांचे विहंगम दृश्य, आल्हाददायक वातावरण आणि गारव्याचा अनुभव पर्यटक घेत आहेत. सध्या मान्सूनची चाहूल लागली असून दुपारनंतर ढग दाटून अचानक रिमझिम पाऊस हजेरी लावत आहे. यामुळे परिसराचे सौंदर्य अधिकच खुलले असल्याचे दिसत आहे. सिलिया पॉइंट, लुईझा पॉइंट या ठिकाणीही पर्यटकांची मोठी वर्दळ पाहायला मिळत आहे.

पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक अर्थचक्रालाही चालना मिळाली आहे. शनिवार आणि रविवारी वाढत्या गर्दीमुळे टॅक्सी स्टँडवर स्थानिक प्रशासनाकडून वाहनांचे नियोजन करण्यात आले आहे. सुट्ट्यांच्या अखेरच्या टप्प्यात माथेरानने पुन्हा एकदा पर्यटकांना मोहिनी घातली असून आगामी पावसाळ्यातही येथे पर्यटकांची गर्दी होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

# दुर्गराज रायगडावर अवतरला शिवकाळ!

## शिवराज्याभिषेक सोहळा उदंड उत्साहात



**महाड : प्रतिनिधी**

दुर्गराज रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त शनिवारी (दि.६) इतिहास, परंपरा आणि शिवभक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशभरातून हजारो शिवप्रेमींनी उपस्थिती लावली होती. यावेळी शिवरायांच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. त्यामुळे गडावर जणू शिवकाळ अवतरल्याचे दिसून आले.

अखिल भारतीय शिवराज्याभिषेक सोहळा समितीमार्फत गेल्या अनेक वर्षांपासून किल्ले रायगडावर शिवराज्याभिषेक सोहळ्याचे आयोजन केले जाते. यंदादेखील मोठ्या उत्साहात हा सोहळा पार पडला. तीव्र उन्हाळा असतानाही या उन्हाची तमा न बाळगता शिवप्रेमींनी रायगड सर केला. दरवर्षीपेक्षा यावर्षी किल्ले रायगडावर तुफान गर्दी लोटली होती. किल्ले रायगडचा पायरी मार्ग, रायगड रोप वे शिवप्रेमींच्या गर्दीने फुलून गेला होता.

ढोलताशे, नगाऱ्यांच्या गजराने गडावर मंगलमय वातावरण निर्माण झाले होते, तर शाहिरांच्या पहाडी आवाजाने आसमंत दुमदुमून गेला. प्रथेप्रमाणे मानाच्या पालख्या राजसदरेवर दाखल झाल्या. वारकऱ्यांची दिंडीही आली. यानंतर छत्रपती संभाजीराजे, सुविद्य पत्नी संयोगिताराजे भोसले, पुत्र शहाजीराजे यांचे राजसदरेवर आगमन झाले. त्यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूर्तीचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर पोलीस दलाच्या वतीने शासकीय मानवंदना देण्यात आली.

सोहळ्यास आमदार संजय चव्हाण, आमदार अभिजित पाटील, नवनिर्वाचित आमदार अनिकेत तटकरे, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष मंगेश वाकडीकर, जिल्हाधिकारी किशन जावळे, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, उपजिल्हाधिकारी रवींद्र शेळके यांच्यासह इतर अधिकारी, पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी लेझीम, मर्दानी खेळ आणि लोककलांनी रंगत वाढवली. या संपूर्ण सोहळ्याची क्षणचित्रे याची देही याची डोळा पाहण्यासाठी शिवभक्तांनी पारंपरिक वेशभूषेत आवर्जून हजेरी लावली होती.

राजसदरेवर आयोजित मुख्य सोहळ्यात संभाजीराजे यांनी विचार व्यक्त केले. रायगड हा देशातील एकमेव किल्ला आहे की जिथे तीन पंतप्रधान आणि दोन राष्ट्रपती येऊन शिवरायांना अभिवादन करून गेले आहेत. त्यामुळे या किल्ल्याचे महत्त्व अनन्यसाधारण असल्याचे त्यांनी सांगितले. गडाचे रायगड विकास प्राधिकरणामार्फत संवर्धन होत असल्याने संभाजीराजेंनी यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे कौतुक करून आभार मानले. **(पान २ वर..)**

भावपूर्ण श्रद्धांजली
जगी ऐसा बाप व्हावा। ज्याचा वंश मुक्तीस जावा।।




स्व. कान्हाशेठ हरी ठाकूर

बुधवार दि. ०३/०६/२०२६ रोजी अल्पशा आजाराने वयाच्या ७४ व्या वर्षी श्री माऊली चरणी विलीन झाले.
त्यांच्या आत्म्यास चिरंतर शांती लाभो हिच माऊली चरणी प्रार्थना!
तुका म्हणे पावठणी। करू स्वर्गाची निशाणी।।

| वार | दिनांक | भजन मंडळाचे नाव | वेळ |
|---|---|---|---|
| रविवार | ०७/०६/२०२६ | ओमकार भजन मंडळ - गोठीवली<br>बुवा - श्री. अरुण म्हात्रे, पखवाज - विशाल म्हात्रे | सायं. ७ ते ८.३० वा. |
| सोमवार | ०८/०६/२०२६ | श्री शारदा भजन मंडळ - विचूंबे,<br>बुवा - श्री दिलीप म्हात्रे, पखवाज - हिरामण पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| मंगळवार | ०९/०६/२०२६ | जय मल्हार प्रासादिक भजन मंडळ - तरघर<br>बुवा- श्री. रूपेश मढवी, श्री. सिद्धेश पाटील,<br>पखवाज - सागर मढवी, किरण ओवळेकर | सायं. ७ ते ८.३० वा. |
| बुधवार | १०/०६/२०२६ | श्री. दत्त प्रासादिक भजन मंडळ - कोपर<br>बुवा - ह.भ.प. वसंतशेठ पाटील, पखवाज - वैष्णव देशमुख | सायं. ७ ते ८.३० वा. |
| गुरूवार | ११/०६/२०२६ | श्री. नवदुर्गा प्रासादिक भजन मंडळ - कोपरा<br>गायिका - सौ. शिवमाला पाटील, पखवाज- निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शुक्रवार | १२/०६/२०२६ | दत्त प्रासादिक भजन मंडळ - आदई<br>बुवा - श्री. गणपत म्हात्रे, पखवाज - चेतन पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| शनिवार | १३/०६/२०२६ | नादब्रम्ह साधना मंडळ - खारघर<br>गुरूवर्य श्री.निवृत्ती बुवा चौधरी, पखवाज - निलेश पाटील | सायं. ७ ते ८.३० वा. |
| रविवार | १४/०६/२०२६ | हनुमान प्रासादिक भजन मंडळ - पडघे<br>संगीत रत्न श्री. शंकुनाथ बुवा पडघेकर,<br>पखवाज - किशोर पाटील, चालक - पांडुशेठ भोईर | सायं. ७ ते ८.३० वा. |

सोमवार | १५/०६/२०२६

हरि किर्तन



सकाळी -१०:०० ते १२:००
किर्तनकार -ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक,
पखवाज साथ - श्री. सुधीर भाऊ कराळे,
तबला साथ - श्री. दिगंबर गायकर,
सहगायक -श्री. अनिल यशवंतराव,
श्री हर्षल घुढे,
सिंथेसाईझर - श्री. दर्शन वाघचौडे



* किर्तनकार *
ह.भ.प. वैभव बुवा मंडलिक

शोकाकुल - समस्त ठाकूर परिवार
टिप - कोणत्याही प्रकारचे दुःखवटे स्वीकारले जाणार नाहीत.

# ‘टाईमलाईन’ समाजात सकारात्मकता पेरणारे पुस्तक -मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई : प्रतिनिधी**

टाईमलाईन हे पुस्तक समाजमाध्यमांवरील पोस्टसचे संकलन आहे. मात्र यामध्ये नकारात्मक विचार शोधूनही आढळणार नाही. टाईमलाईन हे समाजमनात सकारात्मकता पेरणारे पुस्तक असल्याचे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. रवींद्र नाट्यमंदिर येथील पु. ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी येथे लोकमत समूहाचे एडिटर-इन-चीफ राजेंद्र दर्डा यांच्या ‘टाईमलाईन’ या पुस्तकाचे प्रकाशन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते झाले. यावेळी सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार, विधानसभा अध्यक्ष अ‍ॅड. राहुल नार्वेकर, गायिका पद्मजा फेणाणी-जोगळेकर, दिग्दर्शक मधुर भांडारकर, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. अमित मायदेव, सुलेखनकार अच्युत पालव व विजय दर्डा हे उपस्थित होते.




मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लोकमत समूहाचे एडिटर-इन-चीफ राजेंद्र दर्डा यांनी याआधीही झुंबर, माझी भिंत यासारखी विविध विषयांवरील दर्जेदार पुस्तके लिहिली आहेत. नकारात्मकतेने ग्रासून टाकणाऱ्या जगातही सकारात्मक राहता येते हे शिकवणारे हे पुस्तक आहे. बदलत्या काळानुसार आपण सुसंगत राहिले पाहिजे हे त्यांनी या पुस्तकातून आवर्जून सांगितले आहे. लोकमत समूहही काळाबरोबर चालत आहे. राजेंद्र दर्डा यांनी लिहिलेल्या पोस्ट आजही सुसंगत आहेत. समाजमाध्यमे ही अभिव्यक्तीची साधने झाली आहेत हे खरे, पण स्वातंत्र्याचा स्वैराचार होता कामा नये यासाठी समाजमाध्यमाची आचारसंहिता सर्वांनीच पाळणे गरजेचे आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, समाजातील सर्व स्तरातील लोकांची अभिव्यक्ती या पुस्तकाच्या माध्यमातून पहावयास मिळते. या पुस्तकात आत्मपरीक्षणही पहावयास मिळते. हे पुस्तक नव्या पिढीसाठी नक्कीच प्रेरणादायी ठरेल असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. आशिष शेलार म्हणाले, साहित्य, संस्कृती, कला, ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान हा महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आहे. टाईमलाईन हे पुस्तक समाजमाध्यमाची ताकद दर्शविणारे आहे. नव्या धाटणीचे हे पुस्तक समाजमाध्यमाला दिशा देणारे आहे. समाजमाध्यमावरील लेखनाचे मार्गदर्शन या पुस्तकात मिळते असेही सांस्कृतिक कार्य मंत्री अ‍ॅड. शेलार यांनी सांगितले.

राजेंद्र दर्डा म्हणाले, सोशल मीडिया या माध्यमाशी मी स्वतःला जोडून घेतले. नवीन पिढीशी जोडला गेल्याचा आनंद वाटतो. या माध्यमात मी कटुता टाळली. सकारात्मकता जपली. टाईमलाईनमधील घटना प्रेरणा देणा-या आहेत. समाजासाठी काम करणाऱ्यांवर मी लिहिले असल्याचेही दर्डा यांनी सांगितले. यावेळी महापौर रितू तावडे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, कौशल्य मंत्री मंगलप्रभात लोढा, इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे, भाई जगताप, संगीतकार अनु मलिक, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, रामदास भटकळ, सुरेश जैन, संजय राऊत, कृपाशंकर सिंह व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# शिवराज्याभिषेकाहून परतताना शिवप्रेमीचा अपघातात मृत्यू

**पोलादपूर : प्रतिनिधी**

रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानंतर परतीचा प्रवास करत असताना मुंबई-गोवा महामार्गावरील पोलादपूर तालुक्यातील पार्ले गावाच्या हद्दीत मोटरसायकल घसरून झालेल्या अपघातात एकाचा मृत्यू, तर दुसरा जखमी झाला आहे. दोघेही सातारा जिल्ह्यातील आहेत. एका शिवप्रेमीचा परतीच्या प्रवासात मृत्यू झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

कपिल दशरथ केंजळे (३०, रा. केंजळेवाडी, ता. जावळी, जि. सातारा) असे मयत तरुणाचे नाव असून अविनाश रामराव सावंत (४४) जखमी झाला आहे.

अपघाताची माहिती समजताच राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्यकर्ते दीपक उतेकर, अरुण मोहिते, फैजान कुडुपकर, अमित वाडकर, नुरी पालेचा आणि मंगेश चव्हाण यांनी तत्काळ अपघातस्थळी जाऊन जखमींना त्वरित ग्रामीण रुग्णालयात दाखल करून उपचाराची व्यवस्था केली.

पोलादपूर तहसीलदार कपिल घोरपडे तसेच स्थानिक पोलिसांनी अपघातस्थळी आणि ग्रामीण रुग्णालयात उपस्थित राहून गंभीररित्या जखमी झालेल्या व्यक्तीला पुढील उपचारासाठी पाठविण्याचा निर्णय समन्वयाने घेतला.

जखमींपैकी कपिल केंजळे याची प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी माणगाव येथे पाठविण्यात आले. तेथे त्याचा मृत्यू झाल्याचे समजते. त्यामुळे हळहळ व्यक्त होत आहे.

# आदर्श पतसंस्थेचा स्तुत्य उपक्रम; मृत सभासदाच्या कुटुंबाला १० लाखांची विमाभरपाई

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग येथील आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे मृत सभासद कर्जदार रघुनाथ विष्णु पाटील, मु. ढवर, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्या नातेवाईकांना न्यू इंडिया अ‍ॅशुरन्स कंपनीकडून १० लाख रुपये अपघात विमा पॉलिसी अंतर्गत विम्याच्या रकमेचा धनादेश देण्यात आला.



अलिबाग तालुक्यातील रघुनाथ विष्णु पाटील यांनी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेकडून संजीवनी योजनेतून ५० हजार रूपये कर्ज घेतले होते. या कर्जावर आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेने न्यू इंडिया अ‍ॅशुरन्स कंपनीकडून रघुनाथ विष्णु पाटील यांचा अपघात विमा काढला होता. रघुनाथ विष्णु पाटील यांचे सर्पदंशाने निधन झाले.दरम्यान, न्यू इंडिया अ‍ॅशुरन्स कंपनीने रघुनाथ विष्णु पाटील यांच्या कर्जासाठी १० लाख रुपये अपघात विमा मंजूर केला. रघुनाथ विष्णु पाटील यांची पत्नी श्रीमती रविना रघुनाथ पाटील, त्यांचा मुलगा व नातेवाईक यांच्याकडे आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेच्या मुख्य कार्यालयात हा १० लाख रूपयांचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.

यावेळी आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील, अभिजित पाटील, तज्ञ संचालक संजय राऊत, सहकार भारती सहकार प्रशिक्षणचे डॉ. उदय जोशी, न्यू इंडिया अ‍ॅशुरन्स कंपनीचे डेप्युटी मॅनेजर शशिकला श्रीधरन, रिजनल मॅनेजर किशोर सूर्यवंशी, चीफ बिजनेस मॅनेजर किशोर पाटील, बिजनेस असोशिएटस श्रीकांत शिंदे उपस्थित होते.

यापूर्वीही तीन सभासद कर्जदारांना आदर्श पतसंस्थेकडून न्यू इंडिया अ‍ॅशुरन्स कंपनीमार्फत अपघात विम्याची भरपाई देण्यात आल्याची माहिती संस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील यांनी दिली. त्यांना सुद्धा अशा प्रकारचा सभासद कर्जदारांचा विमा उतरविण्याचे आवाहन न्यू इंडिया अ‍ॅशुरन्स कंपनीद्वारे करण्यात आले आहे.

# खालापूर तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये शिवस्वराज्य दिन

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींमध्ये शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सर्व गावांत छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेली स्वराज्याची गुढी दिमाखात उभी करण्यात आली. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांची शिवशाही अवतरली असेच वातावरण निर्माण झाले होते.



६ जून १६७४ रोजी किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. हा ऐतिहासिक सुवर्णदिन शिवराज्याभिषेक दिन म्हणून साजरा केला जातो. याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व परकीय सत्ता झुगारून रयतेचे स्वतंत्र 'हिंदवी स्वराज्य' अधिकृतपणे स्थापन केले आणि ते स्वतः 'छत्रपती' झाले. राज्याभिषेकापासून महाराजांनी राज्याभिषेक शक या नवीन कालगणनेची सुरुवात केली. हा दिवस केवळ एक सोहळा नसून, मराठी माणसाच्या स्वाभिमानाची, स्वातंत्र्याची आणि देशभक्तीची प्रेरणा आहे, असे सरपंच रितू ठोंबरे यांनी सांगितले.

महाराष्ट्र शासनाच्या निर्णयानुसार हा दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून अधिकृतपणे सर्व ग्रामपंचायतींमध्ये साजरा करण्यात येत आहे. खालापुरातील सर्व ग्रामपंचायत कार्यालयांवर भगवे स्वराज्य ध्वज फडकवण्यात आले. स्वराज्यगुढी उभारून शिवरायांना अभिवादन करण्यात आले. 'जय भवानी, जय शिवाजी! हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांना त्रिवार मानाचा मुजरा' या घोषणांनी परिसर दुमदुमला होता.

# हरवलेला मुलगा मुख्य तिकीट परीक्षकाच्या दक्षतेमुळे सुरक्षित

**नागपूर : प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या नागपूर विभागाने सामाजिक बांधिलकी आणि मानवी मूल्यांप्रती असलेली आपली कटिबद्धता पुन्हा एकदा अधोरेखित केली आहे. तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांच्या सतर्कतेमुळे एका असुरक्षित मुलाला संभाव्य धोक्यापासून वाचवून त्याच्या सुरक्षिततेची खात्री करण्यात आली.



६ जून रोजी नागपूर रेल्वे स्थानकाच्या फलाट क्रमांक १ वर कर्तव्य बजावत असताना मुख्य तिकिट परीक्षक प्रवीण लोंडसे यांना एक किशोरवयीन मुलगा संशयास्पद परिस्थितीत स्थानक परिसरात फिरताना आढळला. चौकशी केली असता त्याने आपले नाव मोहम्मद आसिफ, वडिलांचे नाव मोहम्मद याकूब असून तो उत्तर प्रदेशातील गोंडा जिल्ह्याचा रहिवासी असल्याचे सांगितले.मुलाने रेल्वे कर्मचाऱ्यांना सांगितले की, तो मागील दोन महिन्यांपासून रोजगाराच्या शोधात नागपुरात राहत होता आणि त्याची काळजी घेणारे घरी कोणीही नाही. त्याची परिस्थिती लक्षात घेऊन रेल्वे कर्मचाऱ्यांनी त्याला तात्काळ अन्न, पिण्याचे पाणी आणि आवश्यक मदत उपलब्ध करून दिली.

मुलाकडे त्याच्या कुटुंबीयांचे संपर्क क्रमांक उपलब्ध असल्याने त्याची कुटुंबीयांशी संपर्क साधण्यात आला. तसेच रेल्वे कर्मचाऱ्यांनीही त्याच्या नातेवाईकांशी चर्चा करून त्यांना नागपुरात येऊन मुलाला ताब्यात घेण्याची विनंती केली.नियमानुसार पुढील कार्यवाहीसाठी मुलाला बाल सहाय्य सेवेच्या ताब्यात देण्यात आले आहे. त्याच्या कुटुंबीयांना याबाबत माहिती देऊन नागपुरात बोलाविण्यात आले आहे. सर्व आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होऊन मुलाचे सुरक्षितपणे कुटुंबीयांकडे पुनर्मिलन होईपर्यंत त्याची देखभाल बाल काळजी सहाय्य सेवेच्या देखरेखीखाली करण्यात येत आहे.

मुख्य तिकीट परीक्षक प्रवीण लोंडसे यांनी दाखविलेली सतर्कता, संवेदनशीलता आणि सामाजिक जबाबदारीची जाणीव यामुळे या मुलाचे संभाव्य धोक्यापासून संरक्षण होऊन त्याची सुरक्षितता सुनिश्चित करण्यात महत्त्वाची भूमिका बजावली. नागपूर विभागाने मानवतावादी कार्याबद्दल आणि जनसेवेप्रती असलेल्या समर्पणाबद्दल त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले आहे.

# ढेपे दाम्पत्याला ओबीसीरत्न पुरस्कार; शैक्षणिक क्षेत्रातील योगदानाची दखल

**माणगाव : प्रतिनिधी**

राष्ट्रीय ओबीसी बहुजन शिक्षक संघ महाराष्ट्र राज्य यांच्यातर्फे माणगाव येथील शैक्षणिक क्षेत्रात तालुक्यासह रायगड जिल्ह्यात नावलौकिक मिळविलेल्या प्रोफेशनल एज्युकेशन सोसायटीच्या विवा कॉलेजचे प्राचार्य डॉ. विवेक ढेपे व चेअरमन विनया ढेपे या दाम्पत्याला पनवेल येथे शुक्रवारी (दि. ५) संघाच्या झालेल्या प्रथम राज्यस्तरीय अधिवेशन व पुरस्कार सोहळा २०२६ कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते डॉ. पंजाबराव देशमुख ओबीसीरत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



प्राचार्य डॉ. विवेक ढेपे व चेअरमन विनया ढेपे यांना उपरोक्त संघातर्फे सदर पुरस्काराने सन्मानित करण्यात आल्याने त्यांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.प्राचार्य डॉ. विवेक ढेपे व चेअरमन विनया ढेपे या दाम्पत्याने उच्च शिक्षण घेऊन आपल्या माणगाव तालुका परिसरातील विद्यार्थ्यांना व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाचे शिक्षण घेता यावे यासाठी सन २०१८ साली हे महाविद्यालय सुरू केले. गोरगरीब जनतेच्या मुलामुलींना मुंबई-पुणे सारख्या धर्तीवर व्यवसायाभिमुख अभ्यासक्रमाचे शिक्षण कमी खर्चात माणगावमध्येच उपलब्ध व्हावे हा उद्देश नजरेसमोर ठेवून या दाम्पत्यांनी माणगाव नगरीत हे कॉलेज सुरू केले.

या कॉलेजची माणगावात लवकरच नवीन भव्य इमारत साकारणार असून या इमारतीचे काम सुरू आहे. या कॉलेजमध्ये आज रायगड जिल्ह्यासह सातारा, पुणे, छत्रपती संभाजीनगर, रत्नागिरी अशा विविध जिल्ह्यांतून आलेले जवळपास ४०० हून अधिक विद्यार्थी विविध अभ्यासक्रमांचे शिक्षण घेत आहेत.या कॉलेजमध्ये हे दाम्पत्य व त्यांचे सर्व शिक्षकवर्ग विद्यार्थ्यांना सर्वगुणसंपन्न होण्याच्या दृष्टिकोनातून घडविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

# पनवेल स्टेशनजवळ दोन लोकल आल्या एकाच ट्रॅकवर

**पनवेल : वार्ताहर**

हार्बर मार्गावरील पनवेल रेल्वे स्थानकाजवळ दोन लोकल गाड्या एकाच ट्रॅकवर समोरासमोर आल्याने काही काळ खळबळ उडाली होती. सुदैवाने मोटरमनच्या प्रसंगावधानामुळे मोठी दुर्घटना टळली, मात्र या घटनेने हार्बर मार्गावरील रेल्वे वाहतूक पूर्णपणे विस्कळीत झाली आणि हजारो प्रवाशांना मनस्ताप सहन करावा लागला. घटनेनंतर अनेक लोकल गाड्या विविध स्थानकांदरम्यान खोळंबल्या होत्या. उष्णतेचा कडाका असताना तासन्तास गाड्यांमध्ये अडकलेल्या प्रवाशांचा संयम सुटला. काही प्रवाशांनी थेट रेल्वेतून उतरून रुळांवरून पायी जाण्यास सुरुवात केली. महिलांपासून ज्येष्ठ नागरिकांपर्यंत सर्वांनाच जीव मुठीत धरून चालावे लागले. दोन लोकल एकाच ट्रॅकवर कशा आल्या याबाबत रेल्वे प्रशासनाकडून चौकशी सुरू करण्यात आली आहे.



पान १ वरुन

## दुर्गराज रायगडावर शिवकाळ अवतरला!

दरम्यान, सोहळ्यासाठी जिल्हा प्रशासनाने व्यापक नियोजन केले होते. शिवप्रेमींसाठी मोफत बससेवा, अन्नछत्र, पिण्याचे पाणी, आरोग्य सुविधा, स्वच्छता व्यवस्था, सावलीसाठी मंडप आणि आपत्कालीन सेवा उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या. त्याचप्रमाणे कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून किल्ल्यावर कडक पोलीस बंदोबस्त ठेवून सुरक्षेची विशेष काळजी घेण्यात आली.

स्वराज्याच्या वैभवशाली इतिहासाचे स्मरण करून देणारा आणि शिवरायांच्या विचारांचा जागर करणारा हा शिवराज्याभिषेक सोहळा अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात झाला. यानिमित्ताने दुर्गराज रायगडावर पुन्हा एकदा शिवकालीन तेज, शौर्य आणि स्वाभिमानाचा जागर अनुभवायला मिळाला.

# गुरुकुल स्पर्धा परीक्षेत रायगडची चमक; चार विद्यार्थ्यांची ‘इस्रो’ सहलीसाठी निवड

**नागोठणे : प्रतिनिधी**

गुरुकुल एज्युकेशन सोसायटी, कोल्हापूर यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात आलेल्या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेत रायगड जिल्ह्याने उल्लेखनीय यश संपादन केले आहे. रायगड जिल्ह्यातील चार विद्यार्थ्यांसह महाराष्ट्रातील एकूण ६२ विद्यार्थ्यांची भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) यांच्या शैक्षणिक सहलीसाठी निवड झाल्याची माहिती भाजप रोहा तालुका शिक्षण सेलचे अध्यक्ष अशोक अहिरे यांनी पत्रकारांना दिली.




गुरुकुल एज्युकेशन सोसायटी ही संस्था इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतच्या मराठी, सेमी इंग्लिश, इंग्लिश व उर्दू माध्यमातील विद्यार्थ्यांसाठी सन २०११ पासून राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षा आयोजित करत आहे. रायगड जिल्ह्यात प्रथमच ही परीक्षा अशोक अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरित्या पार पडली. यासाठी पोलादपूर, कर्जत, खोपोली, उरण, खारघर ते पनवेलपर्यंत विविध भागांत दौरे करून शिक्षक व पालकांमध्ये स्पर्धा परीक्षेचे महत्त्व पटवून देण्यात आले. परिणामी, रायगड जिल्ह्यातून तब्बल ३,६१७ विद्यार्थ्यांनी परीक्षेत सहभाग नोंदविला.

दि. २५ जानेवारी २०२६ रोजी झालेल्या या स्पर्धा परीक्षेत रायगड जिल्ह्यातील चार विद्यार्थ्यांनी राज्यस्तरावर विशेष यश मिळवत इस्रो भेटीसाठी मानाची निवड मिळवली आहे.

हे चारही विद्यार्थी ४ जून रोजी इस्रोच्या शैक्षणिक सहलीसाठी रवाना झाले असून ५ जून रोजी ते सुखरूप इस्रो केंद्रात दाखल झाले आहेत. त्यांच्या शैक्षणिक व वैज्ञानिक ज्ञानवर्धनाच्या प्रवासाला सुरुवात झाली असल्याची माहिती अशोक अहिरे यांनी दिली. रायगड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांनी मिळविलेल्या या यशामुळे पालक, शिक्षक व शिक्षण क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

**इस्रो भेटीसाठी निवड झालेले विद्यार्थी**

कु. सार्थक सुहास माने इयत्ता ७ वी, सीकेटी इंग्लिश मीडियम स्कूल, न्यू पनवेल, कु. विनीत विनोद कापसे इयत्ता ८ वी, द. ग. तटकरे उच्च माध्यमिक विद्यालय, कोलाड, कु. साई योगेश म्हात्रे इयत्ता ७ वी, रजिप पिगोंडे शाळा, नागोठणे परिसर, कु. शुभ्रा सुधीर शिंदे ग. बा. वडेर हायस्कूल, पाली.

# ४६ वर्षांचे स्वप्न साकारणार!

## करंजा-रेवस खाडीपूल नोव्हेंबर २०२७पर्यंत होणार पूर्ण



**उरण : जीवन केणी**

कोकणवासीयांचे ४६ वर्षांचे स्वप्न असलेला करंजा-रेवस खाडीपूल येत्या १८ महिन्यांत म्हणजेच नोव्हेंबर २०२७पर्यंत पूर्ण होणार आहे. २४७८ कोटी खर्चाच्या या पुलाचे काम पावसाळा व खवळलेल्या उंच लाटांतही अखंडपणे सुरूच राहणार असल्याची माहिती एमएमआरडीएचे उपअभियंता अनिरुद्ध बोराडे यांनी दिली. कोकण, रायगडच्या पर्यटनाला चालना देण्यासाठी तत्कालीन दिवंगत मुख्यमंत्री ए. आर. अंतुले यांनी १९८० साली करंजा-रेवस खाडीपूल उभारण्याच्या कामाला मंजुरी दिली होती.

२.४ किमी लांबीच्या या पुलासाठी तेव्हा ३०० कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यात आली होती. सातत्याने झालेल्या कामाच्या विलंबामुळे मात्र प्रकल्पाचा खर्च आता २४७८ कोटींपर्यंत पोहचला आहे. रेवस-करंजा ही दोन्ही बंदरे आता या खाडीपुलाच्या रस्त्याला जोडली जाणार आहेत. यामुळे नवी मुंबई-अलिबागदरम्यानचे सुमारे २० किमी अंतर कमी होणार आहे. दोन्ही बंदरांना जोडणाऱ्या या पुलामुळे रायगड आणि कोकणात पर्यटनासाठी जाणाऱ्या पर्यटकांना पनवेल, पेण या मार्गाचा वळसा न घालता नवी मुंबईहून करंजा येथून थेट अलिबागला जाता येणार आहे. यामुळे प्रवासाचा वेळ, इंधन आणि अतिरिक्त पैसे वाचतील. तसेच वाहतूक कोंडीअभावी प्रवासही जलद होणार आहे.

अनेक वर्षांपासून समुद्रातून धोकादायक प्रवासावर अवलंबून असलेल्या उरण, अलिबागच्याच नव्हे तर रायगडमधील हजारो नागरिकांना आता रस्त्याने प्रवास सहज शक्य होणार आहे. मागील वर्षापासून करंजा-रेवस खाडीपुलाच्या कामाला एमएमआरडीएने सुरुवात केली आहे. त्यामुळे मागील ४६ वर्षांपासून फाईलवर धूळ खात अडगळीत पडलेला करंजा-रेवस खाडीपूल आता खऱ्या अर्थाने आकारात येऊ लागला आहे.

**२४७८ कोटी खर्चाच्या या खाडीपुलाचे आतापर्यंत १८ टक्के काम पूर्ण झाले आहे. पुलाच्या कामातील अडथळे हळूहळू दूर करण्यात येत आहेत. बाधितांना देण्यात येणारी मोबदल्याची रक्कमही संबंधित विभागाकडे जमा करण्यात आली आहे. या कामातील २ ते ३ किमी क्षेत्रातील कांदळवन, पर्यावरण, सीआरझेड आदी अनेक आवश्यक प्रलंबित परवानग्यांचे काम अंतिम टप्प्यात आहे. पुलाचे काम पावसाळ्यातही आणि खवळलेल्या समुद्राच्या उंच लाटांचा सामना करीत अखंडितपणे सुरूच राहणार आहे.**

**-अनिरुद्ध बोराडे, उपअभियंता, एमएमआरडीए**

# कर आकारणी ग्रामपंचायतीची वैधानिक जबाबदारी

## ◆ गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांच्या सूचना

**नवीन पनवेल : रामप्रहर वृत्त**

ग्रामपंचायत हद्दीतील सर्व इमारती आणि अकृषिक वापराच्या जमिनींवर कर आकारणी करणे व वसुली करणे ही ग्रामपंचायतीची वैधानिक जबाबदारी असल्याचे गटविकास अधिकारी समीर वाठारकर यांनी स्पष्ट केले. याबाबत पंचायत समितीने सर्व ग्रामपंचायतींना सूचना दिल्या आहेत.

ग्रामपंचायतींना कर आकारणी, वसुली आणि त्याच्या वापराचा अधिकार हा घटनात्मक अधिकाराच्या आधारे राज्य कायद्याने प्रदान केलेला वैधानिक अधिकार आहे. त्यामुळे कोणत्याही तरतुदीने ग्रामपंचायतीचा कर आकारणीचा अधिकार निष्कासित होत नाही. कोणत्याही विशेष नियोजन प्राधिकरणाच्या स्थापनेमुळे ग्रामपंचायतीची कर आकारणी गैरलागू ठरत नाही. अकृषिक वापराच्या जमिनीबाबत कर आकारणीमुळे दुबारकर किंवा दुहेरीकर अशी बाब निर्माण होत नाही.

गावाच्या हद्दीतील सर्व इमारतींवर आणि अकृषिक वापर सुरू असलेल्या जमिनीवर कर आकारणी व वसुली करणे ही ग्रामपंचायतीची प्रमुख कायदेशीर जबाबदारी आहे. मात्र ग्रामपंचायतीकडून अचूक कार्यवाही होत नसल्याचे निदर्शनास आले आहे. कर आकारणी करताना काही इमारती प्रक्रियेतून वगळल्या गेल्याचे व कर आकारणीनंतर वाढीव बांधकाम झाल्याचे आढळून येते. त्यामुळे ग्रामपंचायतीचे आर्थिक नुकसान होते.

वार्षिक मूल्य दर तक्त्यानुसार मिळकतीचे भांडवली मूल्यांकन काढून त्यावर ग्रामसभेमार्फत निश्चित केलेल्या दराने कर आकारणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. ग्रामपंचायत हद्दीतील सर्व इमारती, अकृषिक वापर सुरू असलेल्या जमिनी अधिकृत किंवा अनधिकृत/अतिक्रमित असल्या तरी ग्रामपंचायतीने कर आकारणी करणे अनिवार्य आहे. नोंदीमुळे अनधिकृत इमारत अधिकृत होत नाही, असेही स्पष्ट करण्यात आले.

# सार्वजनिक बांधकाम विभागाचे मिलिंद कदम सेवानिवृत्त

**पनवेल : प्रतिनिधी**

सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता मिलिंद कदम हे सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवापूर्ती सोहळ्याचे आयोजन पनवेल येथे करण्यात आले होते. त्यांनी अनेक वर्षे विभागात सेवा केली. बंदर रोड, पनवेल येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यालयात उपविभागीय अधिकारी म्हणून मिलिंद कदम गेली काही वर्षे काम पाहत होते. त्यांच्या कार्यकाळात तालुक्यातील गावांमध्ये अनेक ठिकाणी चांगल्या रस्त्यांची कामे झाली.मृदू स्वभावामुळे त्यांच्यासोबत अनेक मित्र जोडले गेले होते. सेवापूर्ती सोहळ्यास कार्यकारी अधिकारी, वरिष्ठ अधिकारी, कार्यालयीन कर्मचारी यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.



# बीसीटी लॉ कॉलेजमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात

**पनवेल : प्रतिनिधी**



पनवेल येथील बी.सी.टी. लॉ कॉलेजमध्ये जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.कार्यक्रमाची सुरुवात जागतिक पर्यावरण दिनाचे महत्त्व आणि सध्याच्या काळात पर्यावरणासमोरील वाढत्या आव्हानांवर चर्चेने झाली. वाढते वायू व प्लास्टिक प्रदूषण, हवामान बदल, जंगलतोड आणि नैसर्गिक संसाधनांचा ऱ्हास यामुळे पर्यावरण संवर्धनाची गरज अधिक महत्त्वाची बनली आहे.

जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस साजरा करण्याचा उपक्रम नसून पर्यावरण संरक्षणासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस असल्याचे यावेळी सांगण्यात आले.यानिमित्त महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. विद्यार्थी व प्राध्यापकांनी विविध रोपे लावून पर्यावरण संरक्षणाचा संदेश दिला. वृक्षारोपणामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साइडचे प्रमाण कमी होण्यास मदत होते, हवेची गुणवत्ता सुधारते, तापमान नियंत्रणात राहते तसेच जैवविविधतेचे संवर्धन होते. प्रदूषण कमी करण्यासाठी वृक्षारोपण हा प्रभावी उपाय असल्याचे नमूद करण्यात आले.विशेष म्हणजे, विद्यार्थ्यांनी लावलेली प्रत्येक रोपटी "दत्तक वृक्ष" म्हणून स्वीकारण्याचा संकल्प केला.

संबंधित रोपट्यांची नियमित देखभाल, पाणी देणे आणि वाढीची जबाबदारी विद्यार्थ्यांनी स्वतः स्वीकारली. या उपक्रमामुळे वृक्षसंवर्धनालाही चालना मिळणार आहे.कायद्याचे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी पर्यावरण संरक्षणाविषयी विचार व्यक्त केले. पर्यावरण संरक्षण ही केवळ सामाजिक जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे घटनात्मक कर्तव्य असल्याचे त्यांनी नमूद केले. प्लास्टिकचा कमी वापर, पाणी बचत, स्वच्छता आणि अधिकाधिक वृक्ष लागवड करण्याचे आवाहन त्यांनी समाजाला केले.

प्राचार्या डॉ. सानवी देशमुख यांनी विद्यार्थ्यांना पर्यावरणाबाबत जागरूक राहण्याचे आणि संवर्धनासाठी सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. भावी विधिज्ञ म्हणून समाजामध्ये पर्यावरण संरक्षणाविषयी जनजागृती करण्याची जबाबदारी विद्यार्थ्यांनी पार पाडावी, असे त्या म्हणाल्या. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा प्रभावी संदेश देण्यात आला असून विद्यार्थ्यांमध्ये जागरूकता निर्माण झाली.

## इसम बेपत्ता

**पनवेल :** घरात झालेल्या भांडणाचा राग मनात धरून एक इसम कोठेतरी निघून गेले. ते परत आले नाहीत म्हणून ते हरविल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात दाखल करण्यात आली आहे. दिनेश तुकाराम सावंत (५२, रा. उसर्ली खुर्द) रंग-सावळा, उंची अंदाजे ६ फूट ५ इंच असून सफेद रंगाचा फूल बाह्यांचा शर्ट, काळ्या रंगाची पॅन्ट, काळ्या रंगाचे बूट परिधान केलेला, भाषा मराठी व हिंदी बोलतात. या इसमाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ओरायन मॉलची दशकपूर्ती; 'लाभले आम्हांस भाग्य'ने रंगला वर्धापन सोहळा

**पनवेल : वार्ताहर**



पनवेल येथील ओरायन मॉलच्या यशस्वी १० वर्षांच्या प्रवासानिमित्त आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात आनंद सोहळा आयोजित करण्यात आला होता. गेल्या दशकभराचा हा प्रवास आव्हानात्मक आणि बरेच काही शिकवणारा ठरला असला तरी ग्राहकांच्या, नागरिकांच्या आणि सुहृदांच्या खंबीर पाठिंब्यामुळेच मॉलने ही यशस्वी वाटचाल पूर्ण केल्याची भावना व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आली.

वर्धापनदिनाचे औचित्य साधून आयोजित या दिमाखदार सोहळ्याला भाजपचे प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, आमदार विक्रांत पाटील, कोकण म्हाडाचे माजी अध्यक्ष बाळासाहेब पाटील, सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक गणेश देशमुख यांच्यासह अनेक मान्यवरांनी उपस्थित राहून ओरायन मॉल परिवाराला पुढील वाटचालीसाठी मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या बरवा मनोरंजन मंडळी प्रस्तुत "लाभले आम्हास भाग्य" या विशेष सांस्कृतिक कार्यक्रमाने उपस्थितांची मने जिंकली.

या सादरीकरणात सुनील बर्वे, पुष्कर श्रोत्री, आनंद इंगळे, मृण्मयी देशपांडे, गौतमी देशपांडे आणि संगीतकार अजित परब या महाराष्ट्राच्या लाडक्या कलाकारांनी आपल्या बहारदार सादरीकरणाने रंगत आणली. कार्यक्रमावेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, माजी सभागृहनेते तथा नगरसेवक परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, पनवेल शहर अध्यक्ष नगरसेवक सुमित झुंझारराव, ओरायन मॉलचे मालक मंगेश परुळेकर, दिलीप करेलिया, मनन परुळेकर यांच्यासह पनवेलकर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वीर वाजेकर महाविद्यालयातर्फे द्रोणागिरी येथे वृक्षारोपण

**पनवेल :** श्रीमती भागूबाई चांगू ठाकूर विद्यालय, द्रोणागिरी येथे वीर वाजेकर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय, महालण विभाग, फुंडे यांच्या वनस्पती शास्त्र व राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी विद्यालयाचे चेअरमन चंद्रकांत घरत आणि कामगार नेते, स्कूल कमिटी सदस्य सुरेश पाटील यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले.

विद्यालयाच्या मुख्याध्यापक अनुराधा काटे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, सामाजिक कार्यकर्ते डी. के. सोनवणे, डॉ. एन. बी. पवार, प्रा. संतोष देसाई यांच्यासह विद्यालयाचे सर्व शिक्षक व शिक्षकेतर सेवक उपस्थित होते. जागतिक पर्यावरण दिनाच्या घोषवाक्याला अनुसरून 'झाडे लावा, झाडे जगवा. पाणी वाचवा, जीवन वाचवा. प्लास्टिक वापर कमी करा, पर्यावरण जपा' हे साध्य करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.



# रोहित्रातील बिघाडामुळे वीजपुरवठा खंडित

**पनवेल : वार्ताहर**

कामोठे उपनगरातील सुमारे १५ हजार नागरिकांना तब्बल २७ तास वीजपुरवठ्याविना राहावे लागले. ६३० किलोव्होल्ट-अँपिअर क्षमतेच्या रोहित्रात बिघाड झाल्याने हा प्रकार घडल्याचे महावितरणकडून सांगण्यात आले. कामोठे सेक्टर १७ तसेच परिसरातील काही भागांचा वीजपुरवठा रात्री ११ वाजता खंडित झाला. सुरुवातीला तांत्रिक बिघाडामुळे काही वेळात वीजपुरवठा पूर्ववत होईल, अशी नागरिकांची अपेक्षा होती, मात्र सकाळ झाली तरी वीज न आल्याने रहिवाशांनी महावितरणच्या उपकेंद्राशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला.

त्यानंतर नागरिकांनी उपकेंद्र गाठले. उपकेंद्रातील कर्मचाऱ्यांनी दुरुस्तीचे काम सुरू असल्याची माहिती दिली. त्यानंतर नागरिक घरी परतले, मात्र रात्रीपर्यंतही वीजपुरवठा सुरळीत न झाल्याने नागरिकांनी पुन्हा उपकेंद्रात गर्दी केली. या काळात अनेक गृहनिर्माण संस्थांमधील पाणीपुरवठ्यावरही परिणाम झाला. पाणी उंच जलकुंभात चढवण्यासाठी लागणाऱ्या मोटारी बंद राहिल्याने नागरिकांना वीज आणि पाणी या दोन्ही मूलभूत सुविधांच्या समस्येला सामोरे जावे लागले.

महावितरणच्या अभियंत्यांनी दिलेल्या माहितीनुसार ६३० केव्हीए क्षमतेच्या रोहित्रात बिघाड झाल्याने दुरुस्तीला वेळ लागला. कामोठे परिसरात सुमारे २३० रोहित्र कार्यरत आहेत. वाढत्या वीजमागणीच्या पार्श्वभूमीवर अतिरिक्त रोहित्रे उपलब्ध ठेवण्याची आवश्यकता असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

# नंदकुमार म्हात्रे यांच्या पाठपुराव्याने गटारपाण्याच्या समस्येवर उपाययोजना

## धरणा ग्रामस्थांना दिलासा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल तालुक्यातील धरणा गावामध्ये नाल्यातील गटाराचे पाणी रस्त्यावरून वाहत असल्याने परिसरात दुर्गंधी पसरली होती. यामुळे नागरिकांना मोठ्या प्रमाणात गैरसोय सहन करावी लागत होती. विशेषतः आगामी पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिक गंभीर होण्याची शक्यता निर्माण झाली होती. या समस्येची गांभीर्याने दखल घेत ओबीसी सेलचे तालुकाध्यक्ष तथा रोहिंजन ग्रामपंचायतीचे माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांनी संबंधित विभागाकडे सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या पाठपुराव्यामुळे तातडीने उपाययोजना करण्यात आली.

यावेळी माजी सरपंच नंदकुमार म्हात्रे यांनी नागरिकांच्या मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाशी समन्वय साधून पुढील काळातही आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील, अशी ग्वाही दिली. गावातील स्वच्छता, आरोग्य आणि विकासाच्या दृष्टीने अशा समस्यांचे तातडीने निराकरण करणे ही आपली जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी महानगरपालिकेचे कर्मचारी सुरेश पोरजी, नेहाल ठाकूर, उमेश मढवी, काथोर मढवी, सूरज पाटील, हनुमान पाटील तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# नवीन पनवेल येथील आरोग्य शिबिराचा ३६७ नागरिकांनी घेतला लाभ

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त नवीन पनवेल येथे आयोजित आरोग्य शिबिरात एकूण ३६७ नागरिकांनी विविध आरोग्य सेवा व तपासण्यांचा लाभ घेतला. टाटा स्मृती रुग्णालय, खोपोली यांच्या माध्यमातून एकूण ५३ जणांची नोंदणी झाली. यात दोन पुरुष व ५१ महिलांचा समावेश होता. कर्करोग तपासणीअंतर्गत ५३ जणांची मुख कर्करोग तपासणी, ४५ महिलांची स्तन कर्करोग तपासणी व ३० महिलांची गर्भाशय मुख कर्करोग तपासणी करण्यात आली तसेच ३० महिलांची क्ष-किरण चाचणी करण्यात आली.

शिबिराला आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट दिली. शिबिरात ११७ नागरिकांची छातीची क्ष-किरण तपासणी करण्यात आली. यामध्ये ८० पुरुष व ३७ महिलांचा समावेश होता. मेडिकव्हर यांच्या माध्यमातून ६८ जणांची हृदयाची विद्युत आलेख चाचणी, ९७ जणांची फुप्फुस कार्यक्षमता चाचणी व ९७ जणांची श्रवण तपासणी करण्यात आली. हे शिबिर यशस्वीरीत्या पार पडले असून एकूण ३६७ लाभार्थ्यांनी विविध आरोग्य तपासण्या व सेवांचा लाभ घेतला. सर्वांच्या अमूल्य सहकार्यामुळे हे शिबिर यशस्वी झाल्याचे आयोजकांनी सांगितले.



# सुमन कल्याणपूर

## एक आवाज, अनेक गोष्टी...



सुमन कल्याणपूर म्हणताच हिंदी चित्रपट संगीत शौकीनांना पटकन ही गाणी आठवणारच. ना ना करते प्यार तुम्हीं से कर बैठे... चित्रपट जब जब फूल खिले (१९६५), आजकल तेरे मेरे प्यार के चर्चे... चित्रपट ब्रह्मचारी (१९६८), तुमने पुकारा और हम चले आए... चित्रपट राजकुमार (१९६४), मेरे महबूब ना जा... चित्रपट नूर महल (१९६५), दिल एक मंदिर है... चित्रपट दिल एक मंदिर (१९६३), ठहरिए होश में आ लूं... चित्रपट मोहब्बत इसको कहते हैं (१९६५), छोड़ो कल की बातें... चित्रपट हम हिन्दुस्तानी (१९६०), हमने प्यार किया है... चित्रपट दूल्हा-दुल्हन (१९६४), ये किसने गीत छेड़ा... चित्रपट मेरी सूरत तेरी आँखें (१९६३), अजब है दास्तां तेरी ऐ जिंदगी... चित्रपट शराबी (१९६४).

सुमन कल्याणपूर यांना पार्श्वगायनाची पहिली संधी मिळाली त्याची एक आठवण प्रसिद्ध आहे, ही १९५६ सालची गोष्ट आहे. पुणे शहरातील डेक्कन स्टुडिओत एकदा भर दुपारी सुमन हेमाडी (हे सुमन कल्याणपूर यांचे पूर्वाश्रमीचे नाव) एका वडीलधारी व्यक्तीला घेऊन आवाजाची टेस्ट द्यायला आल्या होत्या. तेव्हा एका संगीत दिग्दर्शकाला गाणं गाऊन दाखवले, पण त्याने नापसंती दर्शवल्याने सुमनजी निराश झाल्या आणि अशातच उन्हामुळे व निराशेने घशाला कोरडं पडली म्हणून त्या सोबतच्या वृद्धाला घेऊन चहा प्यायला गेल्या असता त्यांचे कोंकणीतील बोलणं त्या कोंकणी चहावाल्याला लक्षात आले. त्याला एकूणच काय घडलं हे लक्षात येताच तो त्यांना संगीतकार वसंत पवार यांजकडे नेले. चहावाल्याचा वसंत पवार यांच्याशी चांगला परिचय होता. सुमन कल्याणपूर यांनी यावेळी गाऊन दाखवलेले भावगीत वसंतरावांना आवडले आणि विष्णूपंत चव्हाण, वामनराव कुलकर्णी व राजाभाऊ परांजपे यांच्याकडे सुमन कल्याणपूर यांची स्तुती करताना ही मुलगी म्हणजे जणू 'प्रतिलता' आहे असे म्हटले. तेव्हाच सुमन कल्याणपूर यांना 'पसंत आहे मुलगी' (१९५६) या चित्रपटासाठी पार्श्वगायनाची पहिली संधी मिळाली आणि त्यांच्या गायिका या कारकिर्दीला सुरुवात झाली.

सुमन कल्याणपूर यांना भारत सरकारच्या वतीने पद्मभूषण हा पुरस्कार देण्यात आला. त्यांचा जन्म २८ जानेवारी १९३८ रोजीचा. मराठी चित्रपटात सुमन कल्याणपूर यांना पार्श्वगायनाची पहिली संधी संगीतकार वसंत प्रभू यांनी 'दिसतं तसं नसतं' (१९५६) या चित्रपटासाठी संगीतकार वसंत प्रभू यांनी दिली आणि त्याच सुमारास 'पसंत आहे मुलगी' या चित्रपटासाठी आपण पार्श्वगायन केल्याचे एका मुलाखतीत सुमन कल्याणपूर यांनी म्हटले. ते गाणे होते, मानसपूजा करते शबरी'. चित्रपट संगीतात येण्यापूर्वी सुमन कल्याणपूर या पंडित नवरंग नागपूरकर, खाँसाहेब अब्दुल रेहमान खाँ तसेच संगीतकार यशवंत देव यांच्याकडे संगीत शिकत.

सुमन कल्याणपुर म्हटलं की त्यांच्या गायनाचे वैशिष्ट्य त्यांच्या व्यक्तिमत्वात जणू उतरले असे दिसे. निर्मळ शांत, सोज्वळ, सात्विक चेहरा, तेवढाच मधुर आवाज आणि अनेक लोकप्रिय गाणी.. सुमन हेमाडी हे त्यांचे लग्नाआधीचे नाव. रामानंद कल्याणपूर यांच्याशी लग्न होऊन त्या सुमन कल्याणपूर या नावाने सर्व परिचित झाल्या. मराठी भावगीते तसेच सिनेसंगीतात सुमन कल्याणपूर यांचे योगदान फार मोठे आहे. एका गाण्याच्या कार्यक्रमाच्या वेळी तलत महमूद हे सुमनताईंच्या आवाजाने प्रभावित होऊन त्यांनी त्या काळातील आघाडीची म्युझिक कंपनी एचएमव्ही यांच्याकडे त्यांच्या नावाची शिफारस केली. हिंदीतील त्यांच्या वाटचालीबद्दल सांगायचे, तर वयाच्या १७व्या वर्षी त्यांनी मोहमद शफी यांनी संगीत दिलेल्या "मंगु" ( १९५४) या चित्रपटासाठी प्रथम पार्श्वगायन केले होते. गाण्याचे बोल होते "कोई पुकारे धीरे से तुझे". गंमत म्हणजे या चित्रपटाचे संगीतकार ओ. पी.नय्यर होते, पण हे एकच गाणे महम्मद शमी यांनी संगीतबद्ध केले होते. याचे कारण म्हणजे या एकाच गाण्यानंतर महम्मद शफी हे या चित्रपटापासून बाजूला झाले आणि ओ.पी. नय्यर यांच्याकडे हा चित्रपट आला तरी त्यांनी सुमन कल्याणपूर यांचे गाणे कायम ठेवले. त्यानंतर त्यांना जस जशी संधी मिळत गेली तशी त्यांनी त्या काळातील आघाडीच्या पार्श्वगायिका लता मंगेशकर, शमशाद बेगम आणि आशा भोसले यांच्यासह आपले स्थान निर्माण केले. ही खूप महत्त्वाची गोष्ट.

त्यांची काही लोकप्रिय मराठी गाणी सांगायची तर त्यात विविधता दिसते, "जिथे सागरा धरणी मिळते" असे म्हणत प्रियकराची वाट बघणारी प्रेयसी, "घाल घाल पिंगा वार्यार माझ्या परसात, माहेरी जा सुवासाची कर बरसात" असे म्हणणारी सासुरवाशीण, "निंबोणीच्या झाडामागे चंद्र झोपला गं बाई, आज माझ्या पाडसाला झोप का गं येत नाही" ही अंगाई, "कशी गवळण राधा बावरली" ही गवळण, "सांज आली दुरातुनी, क्षीतिजाच्या गंधातुनी" हे विरहगीत, "नाविका रे वारा वाहे रे, डौलाने हाक जरा आज नाव रे", "केतकीच्या बनी तेथे नाचला ग मोर" हे भावगीत, "केशवा माधवा, तुझ्या नामात रे गोडवा", "जगी ज्यास कोणी नाही त्यास देव आहे", "देव माझा विठु सावळा, माळ त्याची माझिया गळा" सारखी भक्तीगीते, "उठा उठा चिऊताई", "या लाडक्या मुलांनो या"सारखी बालगीत अशा विविध मराठी गाण्यांनी एक काळ गाजवला होता, तर काही मराठी चित्रपट गीते सांगायची तर, माहेरच्या अंगणात येतील (सुखाचे सोबती), अरे संसार संसार (मानिनी), रसिका प्रियतमा वेड लाविलेस का? (प्रीती विवाह), उजाड झाला बाग सखे ग उजाड झाला (माझा होशील का?), लावण्याने लाजून जावे (सुभद्राहरण), नको वाजवूस पावा (काय हो चमत्कार), आम्ही इंद्राच्या वारांगना (सवाल माझा ऐका) अशी अनेक गाणी लोकप्रिय आहेत. सुखाची सावली आणि वावटळ या मराठी चित्रपटातील पार्श्वगायनासाठी त्यांना महाराष्ट्र राज्य चित्रपट महोत्सवात सर्वश्रेष्ठ पार्श्वगायनाचा पुरस्कार देण्यात आला. तसेच त्यांना राज्य शासनाच्या वतीने लता मंगेशकर पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. विशेष उल्लेखनीय गोष्ट ही गाणी त्या काळात आकाशवाणी, ग्रामोफोन, लाऊडस्पीकर अशी मोजकीच माध्यमे असूनही लोकप्रिय झालीत याचाच अर्थ ती गाणीच सकस व दर्जेदार आहेत, पण दुर्दैव असे की सुमनताईंनी गायलेली बहुतेक गाणी ही लता मंगेशकर यांनी गायली आहे असा अनेकांचा समज असतो अशी खंत त्यांनी एका मुलाखतीत व्यक्त केली होती.

**झूम प्रहर**



**दिलीप ठाकूर**
चित्रपट समीक्षक

सुमन कल्याणपूर यांनी मराठी भावगीतांपैकी सर्वात जास्त गाणी दशरथ पुजारी यांच्याकडे गायली. यशवंत देव यांच्या संगीत दिग्दर्शनाखालील सुमन कल्याणपूर यांची गाणी सांगायची तर, 'मधुवंतीच्या सुरासुरातून', 'श्रीरामाचे चरण धरावे', 'पक्षिणी प्रभाती चारियासी जाये' ही आहेत. सुमन कल्याणपुर यांनी मराठी व हिंदी व्यतिरीक्त पंजाबी, गुजराती, बंगाली, असामी, कन्नड, भोजपुरी ओरीया भाषेत सुद्धा गाणी गायली आहे. एकूण तेरा भाषांमध्ये त्यांनी ३५०० गाणी गायली. अगर तेरी जलवा नुमाई न होती खुदा जाने तुमसे मुहब्बत न होती (बेटी बेटे), "न तुम हमे जानो न हम तुम्हे जाने मगर लगता है कुछ ऐसा मेरा हमदम मिल गया", (बात एक रातकी), "ठहरीए होश मै आऊ, तो चले जाईएगा", (मोहब्बत इसको कहते है), "तुमसे ओ हसीना कभी मोहब्बत न मैने करनी थी" (फर्ज), "परबतो के पेडो पर शाम का बसेरा है" (शगून) ,"अज हु ना आये बालमा" (सांज और संवेरा), "तुमने पुकारा और हम चले आये" (राजकुमार), "मेरे मेहबुब न जा" (नूर महल), "नाना करते प्यार तुम्हीसे कर बैठे" (जब जब फूल खिले)," आज कल तेरे मेरे प्यार के चर्चे हर जुबान पर" (ब्रह्मचारी), "मेरा प्यार भी तू है" ( साथी), "दिल एक मंदिर है" (दिल एक मंदिर), "शराबी शराबी ये सावन का महिना" (नूरमहल), "आपसे हमको बिछडे हुए" (विश्वास), "चले जा चले जा... जहां प्यार मिले" (जहा प्यार मिले), "मन गाए वो तराना" (चालाक), "दिल ने फिर याद किया" (दिल ने फिर याद किया) या आणि अशा असंख्य गाणी गाऊन त्यांनी हिंदी चित्रपटसृष्टीही गाजवली होती. ही गाणी आज यू ट्यूबवर ऐकता पाहताना सुमन कल्याणपूर यांच्या पार्श्वगायनातील अष्टपैलूत्व, खोली, विविधता कौतुकास्पद वाटते. मोनो रेकॉर्डिंगच्या काळातील अर्थात साठच्या दशकातील ही गाणी पन्नास वर्षांनंतरही आपला गोडवा आणि लोकप्रियता टिकवून आहेत. विशेष गाणे सांगायचे तर, संगीतकार नौशाद यांच्या 'कातिल' (१९६०) या चित्रपटातील फारुख कैसर यांनी लिहिलेले आणि मोहम्मद रफींसोबत गायलेले 'सुनी किसीने बेकहे हमारी दास्ता, तडप के दिल ने कह दिया चुप रही जुबान' याचा खास उल्लेख करायलाच हवा.

लोकप्रियतेच्या या शिखरावरच असताना सुमन कल्याणपूर यांनी एकदम गाणे गायचे सोडून दिले. 'जिथे मन रमत नाही, जिथले व्यवहार मनाला रुचत नाहीत, जिथं उदासपण घेऊन रेंगाळण्यापेक्षा मी स्वेच्छेने पार्श्वगायन सोडलं, पण संगीताशी कधीही फारकत घेतली नाही,' असे त्यांनी म्हटलं आहे. कालांतराने १९९४ साली कमलाकर भागवत यांनी संगीतबद्ध केलेल्या 'अष्टविनायक' या ध्वनीफितीव्दारे काही काळ पुनरागमन केले, पण तितकेच व तात्पुरते. २००९ साली त्यांचे 'सुमन सुगंध' हे आत्मचरित्र प्रसिद्ध झाल्याच्या निमित्ताने त्या आपल्या चाहत्यांसमोर आल्या आणि यानिमित्त त्यांनी काही मुलाखतीही दिल्या. त्याच सुमारास सुमन कल्याणपूर फॅन्स क्लबही स्थापन झाले.

हिंदी चित्रपटसृष्टीत त्यांची वाटचाल सुरू असतानाच्या काळातच काही अंतर्गत वादामुळे रफी यांनी लतादिदींसोबत गाण्याचे सोडून दिल्याने लतादिदींची काही गाणी सुमनताईंच्या वाटेला आली आणि त्यांनी त्या गाण्याचे अक्षरशः सोने केले. लता मंगेशकर आणि सुमन कल्याणपूर या हेमंत कुमार यांनी संगीत दिलेल्या "चांद" (१९५९) ह्या हिंदी चित्रपटाकरिता एकत्र गायल्या होत्या. शैलेन्द्र यांनी लिहिलेल्या या गाण्याचे बोल आहेत, कभी आज कभी कल कभी परसों ऐसी ही बीते... गायनाच्या पलिकडे जाऊन त्यांनी पेन्सिल स्केचेस, प्रोट्रेटस, निसर्गचित्र रेखाटणे, फोटोफ्रेम्स रंगवणे, स्वेटर शाली विणणे, विविध प्रांतातील पाकसिध्दी करणे, प्रेस्टीज तसेच पाव बनवणे असे अनेक छंद जोपासत अनेक लहान लहान गोष्टीत आनंद घेत घेत वाटचाल करीत. देवपूजा या सगळ्यात महत्त्वाची मानत.

एक वेगळीच गोष्ट म्हणजे सुमन कल्याणपूर या यशवंत देव यांच्या शिष्य. त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली त्या 'शुक्राची चांदणी' या चित्रपटासाठी पहिल्यांदा गायल्या. त्या गाण्याचे बोल होते, प्रभू तुझ्या विश्वामध्ये... दुर्दैव म्हणजे हा चित्रपट पूर्ण न झाल्याने हे गाणे रसिकांपर्यंत आलेच नाही. सुमन कल्याणपूर यांच्या कारकीर्दीत अनेक चांगल्या गोष्टी घडतानाच असेही घडले. अर्थात, सुमन कल्याणपूर कायमच लक्षात राहतील हे वेगळे सांगायला नकोच!

---

# पर्यावरणाचा जागर घराघरातून वाढवूया!




पर्यावरण संरक्षण आजच्या काळात का आवश्यक आहे? हा प्रश्न आता केवळ शैक्षणिक चर्चेचा विषय राहिलेला नाही, तर मानवी अस्तित्वाशी निगडित वास्तव बनला आहे. वाढते शहरीकरण, औद्योगिकीकरण, नैसर्गिक साधनसंपत्तीवरील वाढता ताण, हवामानातील बदल, पाण्याची टंचाई आणि जैवविविधतेसमोरील आव्हाने यामुळे पर्यावरण संरक्षणाची गरज पूर्वीपेक्षा अधिक तीव्रतेने जाणवत आहे. मानव आणि निसर्ग यांचे नाते परस्परावलंबी आहे. निसर्गाचे संतुलन अबाधित राहिले, तरच विकासाची वाटचाल शाश्वत होऊ शकते. म्हणूनच दरवर्षी ५ जून रोजी साजरा होणारा जागतिक पर्यावरण दिन हा केवळ एक दिवस नसून पर्यावरण संरक्षणाच्या सामूहिक संकल्पनेचा जागतिक उत्सव आहे, जो नुकताच साजरा झाला.

जागतिक पर्यावरण दिनाची संकल्पना १९७२मध्ये स्वीडनमधील स्टॉकहोम येथे भरलेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरण परिषदेत मांडण्यात आली. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ५ जून हा दिवस जागतिक पर्यावरण दिन म्हणून घोषित केला आणि १९७३पासून त्याचे औपचारिक आयोजन सुरू झाले. या उपक्रमामागील उद्देश जगभरातील नागरिक, संस्था आणि शासन व्यवस्थांना पर्यावरणाबाबत जागरूक करणे हा होता. आज हा दिवस १५०हून अधिक देशांमध्ये विविध उपक्रमांद्वारे साजरा केला जातो.

पर्यावरणाच्या महत्त्वाबाबत जगातील अनेक तज्ज्ञांनी वेळोवेळी महत्त्वपूर्ण विचार मांडले आहेत. पर्यावरणवादी आणि संयुक्त राष्ट्रांच्या माजी अहवालांमध्ये 'पृथ्वी ही आपल्याला पूर्वजांकडून मिळालेली संपत्ती नसून पुढील पिढीकडून घेतलेले कर्ज आहे' हा विचार वारंवार अधोरेखित करण्यात आला आहे. सुप्रसिद्ध पर्यावरण अभ्यासक लेस्टर ब्राऊन यांनी म्हटले आहे की, पर्यावरण आणि अर्थव्यवस्था यांना वेगळे करता येत नाही; पर्यावरण कोलमडले तर अर्थव्यवस्थाही टिकणार नाही, तर ज्येष्ठ पर्यावरणवादी वंगारी मथाई यांनी वृक्षलागवडीला सामाजिक परिवर्तनाचे प्रभावी साधन मानले. या विचारांतून पर्यावरण संवर्धन ही केवळ सरकारी जबाबदारी नसून लोकसहभागाची चळवळ असल्याचे स्पष्ट होते.

भारतातसमोर पर्यावरणासंदर्भात लोकसंख्या वाढ, शहरी विस्तार, पाण्याचे व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि हवामान बदलाच्या परिणामांशी जुळवून घेणे महत्त्वाचे आहे. महाराष्ट्राच्या संदर्भात पाहिले तर जलस्त्रोतांचे संवर्धन, जंगलांचे संरक्षण, शहरी भागातील हरित क्षेत्र वाढविणे, नदी संवर्धन, मृदा धूप रोखणे, सौर ऊर्जा, पवन ऊर्जा या माध्यमातून अक्षय वीज निर्मितीचे लक्ष्य पूर्ण करणे आणि जैवविविधतेचे जतन करणे यांसारख्या बाबींना विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

राज्य शासन, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या संयुक्त प्रयत्नांमुळे या क्षेत्रात अनेक सकारात्मक उपक्रम राबविले जात आहेत. त्यामुळे पर्यावरण संरक्षणाकडे केवळ समस्यांच्या दृष्टीने न पाहता शाश्वत विकासाच्या संधी म्हणून पाहण्याची आवश्यकता आहे. कोणत्याही मोठ्या प्रकल्पासाठी पर्यावरणीय परवानगी आवश्यक मानली जाते. यामागील उद्देश विकासाला अडथळा निर्माण करणे नसून त्या प्रकल्पाचा हवा, पाणी, जमीन, वनसंपदा, वन्यजीव आणि स्थानिक समुदायांवर होणारा परिणाम अभ्यासणे हा आहे. पर्यावरणीय परिणाम मूल्यांकन (एन्व्हायरमेंट इम्पॅक्ट असेसमेंट) प्रक्रियेमुळे विकासकामे अधिक जबाबदारीने आणि शाश्वत पद्धतीने राबविणे शक्य होते. परिणामी विकास आणि पर्यावरण संरक्षण यांच्यात संतुलन राखले जाते. त्यामुळे मोठमोठ्या वसाहती निर्माण करताना पाणवठे निर्माण करणे, त्या बाजूला जैवविविधता निर्माण होईल यासाठी जागरूक असणे आवश्यक आहे. असे छोटे प्रयोग प्रामाणिकपणे निर्माण केल्यास विकास आणि पर्यावरण दोन्ही उद्दिष्टे साध्य करता येतात.

महाराष्ट्र शासनाने पर्यावरण संवर्धनासाठी अनेक महत्त्वपूर्ण उपक्रम हाती घेतले आहेत. पर्यावरण व हवामान बदल विभाग यासाठी विशेष प्रयत्न करत आहे. लोकसहभागातील पर्यावरण कृती कार्यक्रम, जनतेच्या सहभागासह पर्यावरण प्रकल्प राबविण्यात येत आहे. यापूर्वीचे राज्याचे वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी एकाच वर्षी महत्त्वाकांक्षी ५० कोटी वृक्ष लागवड अभियान राबविले होते. दरवर्षी राज्य शासन जून, जुलै महिन्यात मोठ्या प्रमाणात वृक्ष लागवड मोहीम राबविते. सध्या बांधावर बांबू लागवडीची एक मोहीम महाराष्ट्रात यशस्वीपणे राबविली जात आहे.

याशिवाय माझी वसुंधरा अभियान, जलयुक्त शिवार अभियान,राज्य तलाव संवर्धन योजना, शेततळे अभियान, गाळमुक्त धरण गाळयुक्त शेती, नाला रुंदीकरण व खोलीकरण योजना, नदी संवर्धन उपक्रम, महाराष्ट्र राज्य जैवविविधता मंडळाचे कार्यक्रम, मँग्रोव्ह संवर्धन प्रकल्प तसेच ग्रामीण व शहरी भागांमधील विविध हरित उपक्रमांमुळे पर्यावरण संरक्षणाला चालना मिळत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख योजनांपैकी एक असणाऱ्या जलयुक्त शिवार योजनेतून जलस्त्रोतांमध्ये वृद्धी झाल्याचे सिद्ध झाले आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेला देशातील अनेक राज्यांनी लागू केले आहे. यातून प्रोत्साहन घेऊन अलीकडेच राज्यात हरित क्षेत्र वाढविण्यासाठी व्यापक वृक्षलागवड आणि वनसंवर्धनाच्या नव्या संकल्पनांनाही प्रोत्साहन दिले जात आहे.राज्याच्या हरित आच्छादनात वाढ करण्यासाठी दीर्घकालीन उद्दिष्टांसह विविध उपक्रम राबविले जात आहेत.

हरित पट्टा वाढविण्यासाठी शासनाबरोबरच विविध सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था आणि नागरिकही पुढे येत आहेत. शहरी भागांमध्ये उद्याने, जैवविविधता उद्याने, रस्त्यालगत वृक्षलागवड, नदीकाठ संवर्धन आणि स्थानिक वृक्ष प्रजातींचे संरक्षण यावर भर दिला जात आहे. ग्रामीण भागात सामाजिक वनीकरण, गाव तळी, तलाव खोलीकरण, नाला रुंदीकरण, परिसरातील हरितीकरण आणि सामुदायिक वृक्षलागवड कार्यक्रम प्रभावीपणे राबविले जात आहेत. या उपक्रमांमुळे पर्यावरणीय समतोल राखण्यास मदत होत आहे.

पर्यावरण संरक्षणाची खरी ताकद मात्र सामान्य नागरिकांमध्ये आहे. प्रत्येकाने आपल्या परिसरात लहान-लहान पर्यावरणीय व्यवस्था (इकोसिस्टम) विकसित करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. घराच्या अंगणात, गच्चीवर, शाळा-महाविद्यालय परिसरात किंवा सार्वजनिक जागांमध्ये स्थानिक वृक्ष, फुलझाडे, औषधी वनस्पती लावून जैवविविधतेला प्रोत्साहन देता येते. पावसाचे पाणी साठविणे, प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे वर्गीकरण करणे, पाण्याची बचत करणे आणि स्थानिक जलस्रोतांचे संरक्षण करणे ही देखील पर्यावरण संवर्धनाची प्रभावी साधने आहेत.

'जल, जमीन आणि जंगल ' ही आपल्या जीवनव्यवस्थेची तीन मूलभूत आधारस्तंभ आहेत. त्यांचे संरक्षण करणे ही आजच्या पिढीची नैतिक जबाबदारी आहे. आपण ज्या नैसर्गिक संपत्तीचा लाभ घेत आहोत, ती पुढील पिढीपर्यंत सुरक्षितपणे पोहोचविणे हेच खरे शाश्वत विकासाचे तत्त्व आहे. मान्सूनच्या आगमनानंतर राज्यभर पेरणीच्या कामांना वेग येतो. मान्सूनच्या वेळापत्रकावर शेतकऱ्यांची पेरणी अवलंबून असते. जून-महिना हा पावसाळ्याची चाहूल देणारा महिना आहे. वृक्षलागवडीसाठीही हा सर्वोत्तम काळ मानला जातो. प्रत्येक कुटुंबाने आपल्या कुटुंबातील सदस्यसंख्येइतकी झाडे लावण्याचा संकल्प केला, तर पर्यावरण संवर्धनाच्या चळवळीला मोठी गती मिळू शकते. ज्यांच्याकडे स्वतःची जागा नाही, त्यांनी शाळा, महाविद्यालये, ग्रामपंचायत परिसर, सार्वजनिक जागा किंवा शासनाच्या वृक्षलागवड मोहिमांमध्ये सहभागी व्हावे. पर्यटनाला जाताना सोबत 'सीडबॉल' घेऊन जाणे, जंगल परिसरात वृक्ष लागवडीला त्यातून गती देणे सहज शक्य आहे, मात्र केवळ झाडे लावणे पुरेसे नाही; त्यांचे संगोपन आणि संवर्धनही तितकेच महत्त्वाचे आहे.

**-प्रवीण टाके,** उपसंचालक
विभागीय कार्यालय, कोल्हापूर

---

# पर्यटन क्षेत्रातील उद्योजकतेसाठी महाराष्ट्र शासनाची 'आई' योजना

महाराष्ट्र शासनाच्या पर्यटन विभागामार्फत महिला पर्यटनाला चालना देण्यासाठी आणि महिलांमध्ये उद्योजकता व नेतृत्वगुण विकसित करण्यासाठी एक अत्यंत महत्त्वाकांक्षी पाऊल उचलण्यात आले आहे. १९ जून २०२३च्या शासन निर्णयानुसार पर्यटन संचालनालयाने महिलांच्या सक्षमीकरणासाठी 'आई' महिला केंद्रित आणि लिंग समावेशक पर्यटन धोरण अधिकृतपणे जाहीर केले आहे. महिला उद्योजकता विकास, महिलांकरिता दर्जेदार पायाभूत सुविधा, महिला पर्यटकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य, महिला पर्यटकांसाठी कस्टमाईज्ड उत्पादने आणि सवलती, तसेच प्रवास व पर्यटन विकास अशा महत्त्वपूर्ण पंचसूत्रीवर हे धोरण आधारलेले आहे. पर्यटन क्षेत्रात महिलांचा सहभाग केवळ पर्यटक म्हणून नव्हे, तर यशस्वी व्यावसायिक व मार्गदर्शक म्हणून वाढवणे हा या योजनेचा मुख्य उद्देश आहे.

या धोरणांतर्गत पर्यटन संचालनालयाने महिला उद्योजकांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्यासाठी अत्यंत फायदेशीर अशा प्रोत्साहने व सवलतींची तरतूद केली आहे. पर्यटन क्षेत्राशी संबंधित कोणताही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष व्यवसाय सुरू करण्यासाठी महिला उद्योजकांनी अधिकृत बँकेकडून १५ लाख रुपयांपर्यंतचे कर्ज मंजूर करून घेतल्यास त्या कर्जावरील व्याजाचा परतावा १२ टक्के दराने किंवा कमाल ४.५० लाख रुपयांपर्यंत, अथवा सात वर्षांच्या कर्ज कालावधीसाठी यापैकी जे आधी घडेल ते पर्यटन संचालनालयाकडून थेट केला जाणार आहे. थोडक्यात सांगायचे, तर महिलांना १५ लाखांपर्यंतचे कर्ज एका प्रकारे बिनव्याजी स्वरूपात उपलब्ध होणार आहे. ही सवलत मिळवण्यासाठी संबंधित पर्यटन व्यवसाय हा पूर्णपणे महिलांच्या मालकीचा आणि त्यांच्याद्वारेच चालविला गेलेला असणे आवश्यक आहे तसेच त्या व्यवसायामध्ये किमान ५० टक्के व्यवस्थापकीय व इतर कर्मचारी वर्ग महिला असणे अनिवार्य करण्यात आले आहे. यासोबतच लाभार्थी महिला, तिचा व्यवसाय आणि कर्ज देणारी बँक ही महाराष्ट्रातच स्थित असणे आवश्यक असून कर्ज खाते आधार लिंक असणे आणि कर्जाचे हप्ते वेळेत भरणे गरजेचे आहे.

या योजनेची व्याप्ती अत्यंत मोठी असून यामध्ये पर्यटन क्षेत्राशी निगडित विविध प्रकारच्या व्यवसायांचा समावेश करण्यात आला आहे. महिला उद्योजक या योजनेचा लाभ घेऊन कॅरव्हॅन, बिचशॅक, साहसी पर्यटन (जमीन, हवा व जल), पर्यटक सुविधा केंद्र, कृषी पर्यटन केंद्र, होमस्टे, निवास व न्याहरी (बेड अँड ब्रेकफास्ट), रिसॉर्ट, मोटेल, हाऊसबोट, टेंट, ट्रीहाऊस, व्होकेशनल हाऊस, पर्यटन व्हिला, वूडन कॉटेजेस आणि पॉड्स यांसारखे नाविन्यपूर्ण प्रकल्प सुरू करू शकतात तसेच महाभ्रमण, रेस्टॉरंट, उपहारगृह, फास्टफुड केंद्र, महिला चलित कॉमन किचन, कॅफे, बेकरी यांसारखे खाद्य व्यवसाय किंवा टूर ऑपरेटर, ट्रॅव्हल एजंट, टूर मार्गदर्शक, क्रूझ सेवा आणि टूर अँड ट्रॅव्हल एजन्सी यांसारख्या सेवा क्षेत्रातही आपले नशीब आजमावू शकतात. एवढेच नव्हे तर आर्ट अँड क्राफ्ट व्हिलेज, सोव्हिनिअर शॉप, स्थानिक उत्पादनांची विक्री केंद्रे, धार्मिक स्थळांवरील मान्यताप्राप्त प्रसाद विक्री दुकाने, इव्हेंट मॅनेजमेंट, आणि पर्यटकांसाठी ई-व्हेहिकल्स, रिक्षा, मोटरसायकल, बस किंवा चारचाकी वाहने पुरवण्याचे व्यवसायही या योजनेसाठी पात्र आहेत. याशिवाय मेडीकल पर्यटन, वेलनेस सेंटर, आयुर्वेद व योगा केंद्र आणि आदिवासी निसर्ग पर्यटनाशी संबंधित प्रकल्पांनाही या धोरणात स्थान देण्यात आले आहे.

या योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया पूर्णपणे ऑनलाईन असून इच्छुक महिलांनी पर्यटन विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर www.maharashtratourism.gov.in उपलब्ध असलेल्या विहित नमुन्यात अर्ज करायचा आहे. अर्जासोबत ५० रुपये प्रक्रिया शुल्क भरल्याची पावती, अर्जदाराचा पासपोर्ट फोटो, व्यवसाय महिलेच्याच मालकीचा असल्याचे प्रमाणित करणारे ५०० रुपयांच्या स्टॅम्प पेपरवरील नोटरीकृत प्रतिज्ञापत्र, पॅन कार्ड आणि वैयक्तिक आधार कार्ड जोडणे आवश्यक आहे. ओळखीचा पुरावा म्हणून आधार कार्ड, पासपोर्ट, ड्रायव्हिंग लायसन्स किंवा मतदार ओळखपत्रांपैकी एक कागदपत्र सादर करावे लागेल. तसेच आधारलिंक बँक खात्याचे पासबुक किंवा रद्द केलेला चेक, व्यवसायाच्या पत्त्याचा पुरावा (उद्योग नोंदणी, वीज बिल किंवा दुकान परवाना), आणि जागेच्या मालकीचा दस्तऐवज (७/१२ उतारा, प्रॉपर्टी कार्ड, ८-अ नमुना किंवा नोंदणीकृत भाडेकरार) जोडावा लागेल. व्यवसायाच्या स्वरूपानुसार अन्न व औषध प्रशासन परवाना, निधी पोर्टल किंवा पर्यटन संचालनालयाचे नोंदणी प्रमाणपत्र, जीएसटी क्रमांक आणि प्रकल्पाची ५०० शब्दांतील संक्षिप्त माहिती सादर करावी लागेल. सर्व कागदपत्रे योग्य आढळल्यास पात्रता प्रमाणपत्र दिले जाईल, ज्याच्या आधारे बँकेकडून कर्ज मंजूर करून घेता येईल. महिलांनी नियमित हप्ते भरल्यानंतर व्याजाची रक्कम थेट त्यांच्या आधार लिंक खात्यात जमा केली जाणार असल्याने, महिलांनी या सुवर्णसंधीचा लाभ घेऊन पर्यटन क्षेत्रात आपली नवी ओळख निर्माण करावी. अधिक माहितीसाठी कार्यालयीन वेळ सकाळी १० ते सायंकाळी ६पर्यंत दूरध्वनी क्रमांक ०२२-२०८७६४१६/८००७०७९३२१ या क्रमांकावर संपर्क करा.

**-प्रवीण डोंगरदिवे,** उपसंपादक
विभागीय माहिती कार्यालय, कोकण विभाग

# श्रीवर्धनच्या मेटकर्णी येथील चार सराईत गुन्हेगार हद्दपार

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहराला लागूनच असलेल्या आराठी ग्रामपंचायत हद्दीमधील मेटकर्णी या परिसरातील चार गावगुंडांना उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांच्या आदेशाने हद्दपार करण्यात आले आहे. हद्दपार करण्यात आलेल्यांमध्ये अमित निरंजन शिगवण, सोनू संतोष रसाळ व विकास संतोष रसाळ यांचा समावेश आहे. सदर आरोपींवर दापोली, मंडणगड, गोरेगाव, म्हसळा व श्रीवर्धन या पोलीस ठाण्यांमध्ये चोरीचे गुन्हे दाखल आहेत.

त्याचप्रमाणे गर्दी जमवून पोलीस ठाण्यामध्ये धांगडधिंगा घालणे, सार्वजनिक शांतता बिघडवून कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण करणे, असे गुन्हेही त्यांच्यावर नोंद आहेत. तसेच गणेश रामनाथ निकम, रा. मेटकर्णी याच्यावरही मारामारी, महिला छेडछाड व बेकायदेशीर जमावाचा भाग होणे इत्यादी गुन्हे दाखल होते.

सदर गावगुंडांवर श्रीवर्धन पोलीस ठाण्यामध्ये विविध प्रकारच्या गुन्ह्यांची नोंद असल्यामुळे पोलिसांनी त्यांच्या हद्दपारीसाठी उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांच्याकडे अर्ज केला होता.

त्यानुसार उपविभागीय अधिकारी श्रीवर्धन यांच्या आदेशाने वरील चारही आरोपींना हद्दपार करण्यात आले आहे. मेटकर्णी तसेच श्रीवर्धन तालुक्यातील अजून काही गावगुंडांवरही हद्दपारीची कारवाई होण्याची शक्यता असून पोलिसांकडून त्यांच्यावरही हद्दपारीसाठी अर्ज केले जाऊ शकतात.

आर्थिक गैरव्यवहार, खंडणी मागणे, फसवणूक त्याचप्रमाणे बेकायदेशीर जमाव जमवून पोलीस ठाण्यात येणे असे प्रकार रडारवर असलेल्या गावगुंडांकडून करण्यात आल्यास श्रीवर्धन पोलिसांकडून सदर गावगुंडांवरही कारवाईचा बडगा उगारला जाऊ शकतो, असे चिन्ह आहे.

# माथेरानमधील पॉइंटचे रस्ते होणार सुस्थितीत; नगराध्यक्ष चौधरींचा पुढाकार

**माथेरान : प्रतिनिधी**



माथेरानला पायी चालत जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्याने पावसाळ्यात तसेच सततच्या रहदारीमुळे अनेक ठिकाणी पॉइंट्स भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. हे रस्ते पूर्ववत करण्यासाठी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी स्वतः हजर राहून रस्त्यांची कामे उत्तम प्रकारे करून घेत आहेत. हरमिटेज बंगला ते एको पॉईंटकडे जाणाऱ्या दगड मातीच्या रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात आले असून पर्यटकांना चालण्यासाठी त्याचबरोबर अन्य वाहतुकीसाठी हा रस्ता सोयीचा ठरणार आहे.

माथेरानला अनेक ठिकाणी पॉइंट्सकडे जाणाऱ्या रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे. मॅलेट स्प्रिंग, पेमास्टर गार्डनपासून भाऊसाहेब राऊत मार्ग, भेकर रोड, आर्टिस्ट पॉइंट रोड, हॉटेल वे साईड ते सेसिल हॉटेल रोड अशा भागातील रस्ते विकासाच्या प्रतीक्षेत आहेत.

# अकोल्यातून किल्ले रायगडकडे शिवभक्तांची मानाची पालखी

**पाली : प्रतिनिधी**



छत्रपती शिवाजी महाराज यांच्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त अकोल्यातून रायगड किल्ल्याकडे निघालेली मानाची पालखी गुरुवारी (दि. ४) सायंकाळी ३०० मावळ्यांसह पालीत दाखल झाली. शुक्रवारी (दि. ५) सकाळी बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन पालखी रायगडकडे मार्गस्थ झाली. शिवराज्याभिषेक दिनाचा इतिहास, त्याचे महत्त्व आणि या गौरवशाली परंपरेचे स्मरण जपण्यासाठी अकोल्यातून राबवला जाणारा हा उपक्रम शिवभक्तांसाठी अभिमानाचा क्षण ठरत आहे.

शिवराय ग्रुप अकोलाच्या वतीने मंगळवारी अकोल्यातून या पालखीचे रीतसर पूजन करून वाजतगाजत आणि फटाक्यांच्या आतषबाजीत भव्य शोभायात्रा काढण्यात आली होती. या सोहळ्यानंतर पालखी आणि ३०० मावळे खासगी बसद्वारे रायगडाकडे रवाना झाले. रायगडावर ६ जून रोजी होणाऱ्या मुख्य शिवराज्याभिषेक दिनानिमित्त ही पालखी गडावर पोहचली आहे. प्रवासादरम्यान ही पालखी वढू बुद्रुक येथे मुक्कामी होती. त्यानंतर पालखीचे पालीमध्ये आगमन झाले. यावेळी इतिहास संशोधक संदीप परब यांनी पालखी सोहळ्यातील शिवभक्तांना मार्गदर्शन केले.

भाजपचे महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेश मपारा यांनी शिवभक्तांच्या न्याहारीचे नियोजन केले होते. यावेळी बल्लाळेश्वर देवालयाचे विश्वस्त प्रमोद पावगे उपस्थित होते. या पालखी सोहळ्याच्या पालीतील नियोजनात दुर्गसेवक गणेश रघुवीर यांचे विशेष सहकार्य लाभले. त्याबद्दल शिवराय ग्रुपच्या वतीने सर्व उपस्थितांना छत्रपती शिवाजी महाराजांची आकर्षक फ्रेम भेट देऊन सन्मानित करण्यात आले. दरम्यान, शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त अखंड रायगड जिल्ह्यामध्ये आनंदाचे आणि अभिमानाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# भाजपकडून पर्यावरण दिनी खोपोलीत वृक्षारोपण

**खोपोली : प्रतिनिधी**

पर्यावरण दिनाचे औचित्य साधत भारतीय जनता पक्ष खोपोलीच्या वतीने उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांच्या उपस्थितीत शहराच्या विविध भागात वृक्षारोपण कार्यक्रम राबविण्यात आला. हा कार्यक्रम खोपोली मंडळ अध्यक्ष अजय इंगुलकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडला.

यावेळी सरचिटणीस विकास खुरपडे, नगरसेविका प्रतीक्षा रेटरकर, सानिया शेख, अश्विनी अत्र, संजय तन्ना, दिलीप पवार, सचिन मोरे, अपर्णा साठे, राजेंद्र शेट्टे, रसिका शेटे, सुनिता महर्षी, सीमा मोगरे, विवेक पेंडभाजे यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी बोलताना उपनगराध्यक्ष विक्रम साबळे यांनी पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येक नागरिकाने एक तरी झाड लावलेच पाहिजे, असा आग्रह धरला.



# मुरूडमधील नगर परिषद शाळांची पाहणी; उपाययोजनांच्या सूचना

**मुरूड : प्रतिनिधी**



नवीन शैक्षणिक वर्ष सुरू होण्याच्या पार्श्वभूमीवर उपनगराध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती विरेंद्र भगत यांनी मुरूड जंजिरा नगरपरिषद शिक्षण मंडळाच्या विविध शाळांना भेट देऊन पाहणी केली व समस्या जाणून घेतल्या. यावेळी गटनेते तथा पाणीपुरवठा सभापती पांडुरंग आरेकर, पर्यटन व नियोजन सभापती रुपेश रणदिवे, बालकल्याण समिती सभापती नगमाना खानजादे, नगरसेवक मनिष विरकुड, विरोधी पक्षनेते अंकिता गुरव, नगरसेवक अ‍ॅड. रुपेश पाटील यांच्यासह शिक्षक वर्ग उपस्थित होता.

उपनगराध्यक्ष विरेंद्र भगत यांनी शाळांना भेट देऊन पायाभूत सुविधा, स्वच्छता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था आदी सुविधांचा आढावा घेतला. पाहणीदरम्यान मुख्याध्यापक, शिक्षक व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून शाळांसमोरील विविध समस्या घेतल्या. काही ठिकाणी दुरुस्तीची कामे, स्वच्छतागृहांची देखभाल तसेच इतर मूलभूत सुविधांबाबत सूचना प्राप्त झाल्या. उपनगराध्यक्षांनी संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक त्या समस्या तातडीने सोडविण्याच्या सूचना दिल्या.

विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीपासूनच चांगल्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. या पाहणीमुळे शाळांतील प्रलंबित प्रश्न मार्गी लागण्यास मदत होणार असून, विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित व सुविधायुक्त वातावरणात शिक्षण घेता येणार आहे. तसेच विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढविण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे उपनगराध्यक्ष तथा आरोग्य व शिक्षण सभापती विरेंद्र भगत यांनी सांगितले.

# तळा येथे विद्यार्थी गुणगौरव सोहळा उत्साहात

**तळा : प्रतिनिधी**



तळा तालुका सेवानिवृत्त संघटना (संलग्न) रायगड जिल्हा सेवानिवृत्त संघटना (रजि. नं. ९२६/२९९ १९८६) या तळा तालुका शाखेच्या वतीने इयत्ता १० वी व इयत्ता १२ वीतील यशस्वी विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार समारंभ चंडिका कॉम्प्लेक्सच्या सभागृहात संघटनेचे अध्यक्ष अनंत वारे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला.

यावेळी माजी अध्यक्ष भानू मंचेकर, प्रमुख अतिथी पुरुषोत्तम मुळे, सचिव दिपक ठाकूर, जनार्दन वडके, जानराव, मुतुंगे, कृष्णा पंदेरे, मनोहर चव्हाण, गोविंद ठाकर, परशुराम गायकवाड, अरविंद जंगम, रातवडकर, गाडगीळ, कल्पना गायकवाड, अस्मिता वारे, जानराव आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात १० वी व १२ वीतील यशस्वी विद्यार्थी श्रावणी शिंदे, प्रणव बाईत, चंद्रशेखर शिंदे, गौरी रातवडकर, याज्ञी रातवडकर आदी विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह, श्रीफळ, पुष्प देऊन गौरविण्यात आले.

याप्रसंगी विद्यार्थिनी श्रावणी शिंदे व प्रमुख अतिथी पुरुषोत्तम मुळे, भानू मंचेकर, अनंत वारे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संघटनेच्या उपक्रमांतर्गत २२ सभासदांचे वाढदिवस साजरे करण्यात आले. तसेच जानराव व सौ. जानराव यांचा वाढदिवस साजरा करून विशेष सत्कार करण्यात आला. मासिक सभा घेऊन सेवानिवृत्त सदस्यांच्या समस्या व अडीअडचणींवरही चर्चा करण्यात आली. असणारे सर्व प्रश्न संघटनेच्या माध्यमातून सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल, असे अध्यक्ष अनंत वारे यांनी सूचित करून आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# खालापूर पंचायत समितीत शिवस्वराज्य दिन राजदंड गुढी

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पंचायत समितीमध्ये शिवस्वराज्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. सभापती कृष्णा पारंगे व गटविकास अधिकारी संदीप कराड यांच्या हस्ते गुढीचे पूजन करण्यात आले. छत्रपती शिवाजी महाराजांनी उभारलेली स्वराज्याची गुढी दिमाखात उभी करण्यात आली. ६ जून १६७४ रोजी किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक झाला. हा ऐतिहासिक सुवर्णदिन शिवराज्याभिषेक दिन म्हणून साजरा केला जातो.

याच दिवशी छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्व परकीय सत्ता झुगारून रयतेचे स्वतंत्र 'हिंदवी स्वराज्य' अधिकृतपणे स्थापन केले आणि ते स्वतः 'छत्रपती' झाले. राज्याभिषेकापासून महाराजांनी राज्याभिषेक शक या नवीन कालगणनेची सुरुवात केली. हा दिवस केवळ एक सोहळा नसून, मराठी माणसाच्या स्वाभिमानाची, स्वातंत्र्याची आणि देशभक्तीची प्रेरणा आहे, असे गौरवोद्गार सभापती कृष्णा पारंगे यांनी काढले.

शासनाच्या निर्णयानुसार हा दिवस शिवस्वराज्य दिन म्हणून अधिकृतपणे पंचायत समितीत साजरा करण्यात येत आहे. राजदंड स्वराज्य गुढी उभारून शिवरायांना अभिवादन करण्यात आले.



# रायगड पाहून शिवप्रेमींच्या चेहऱ्यावर समाधान

**माणगाव** : छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेक सोहळ्याच्या पार्श्वभूमीवर किल्ले रायगडावर देशाच्या विविध भागांतून शिवप्रेमी आणि पर्यटक मोठ्या संख्येने भेट देत आहेत. याच पार्श्वभूमीवर छत्रपती संभाजीनगर येथून रायगड दर्शनासाठी आलेल्या काही तरुणांनी गडाबाबतच्या आपल्या भावना व्यक्त केल्या. तसेच रायगड पाहून समाधान व्यक्त केले. प्रथमच रायगड किल्ल्याचे दर्शन घेतल्यानंतर या तरुणांनी आनंद व्यक्त केला. छत्रपती शिवाजी महाराजांची राजधानी आणि मराठी स्वराज्याचे प्रेरणास्थान असलेला रायगड प्रत्यक्ष पाहण्याची इच्छा पूर्ण झाल्याचे त्यांनी सांगितले.


**ग्रुप ग्राम पंचायत ऐनघर**

**मु. पो. ऐनघर, ता. रोहा, जि. रायगड.**

**ग्रामनिधी विकास कामे खालीलप्रमाणे-:**

| अ.क्र. | वस्तू/साहित्य नाव | अंदाजित साहित्ये तपशील | निधीचा स्त्रोत |
|---|---|---|---|
| १ | मौजे बाळसई येथिल कालव्यातील घनकचऱ्याचे व्यवस्थापन (साफ साफाई) करणे. | | ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग |
| २ | ग्रा.पं. ऐनघर हद्दीमधील वाड्यांमध्ये स्ट्रीट लाईन (श्री पेज वायर) खरेदी करणे. | | ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग |
| ३ | ग्रा.पं. ऐनघर कार्यालयासाठी कारपेट खरेदी करणे. | | ग्रामनिधी |
| ४ | मौजे सुकेळी धनगरवाडा येथे पाण्याची पाईप लाईन टाकणे. | | ग्रामनिधी |
| ५ | घंटागाडी खरेदी करणे. | १ नग | ग्रामनिधी / १५ वा वित्त आयोग |
| ६ | लाऊडस्पीकर | १ नग | ग्रामनिधी |
| ७ | ए.सी | १ नग | ग्रामनिधी |
| ८ | सी.सी.टीव्ही | १ नग | ग्रामनिधी |

- निविदा मागविण्याची तारीख १०/०६/२०२६ रोजी सायं. ५.०० पर्यंत.
- निविदा उघडण्याची तारीख ११/०६/२०२६ रोजी दुपारी २.०० पर्यंत.
- उघडलेल्या निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे याचे अधिकार प्रशासक ग्रुप ग्रामपंचायत ऐनघर यांना राहिल.

**अटी व शर्ती खालील प्रमाणे :-**

१. निविदा दिनांक ०६/०६/२०२६ ते १०/०६/२०२६ पर्यंत सुटीचे दिवस वगळून ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.
२. प्रत्येक कामाची निविदा स्वतंत्र असावी व सोबत GST प्रमाणपत्र पॅनकार्ड सुशिक्षित बेरोजगार अभियंता प्रमाणपत्र / रजिस्टर ठेकेदार एकत्र लखोट्यात असावे.
३. पोस्टाने आलेल्या निविदा स्विकारण्यात येणार नाही.
४. सर्व निविदा मोहोरबंद असाव्या.
५. निविदा धारकास आपले संपर्क नंबर निविदा वरती देण्यात यावे. जेणे करून निविदा उघडण्याचे कालावधी आपणास कळविण्यात येईल.
६. सदर वस्तू आवश्यकते नुसार मागविण्याचा अधिकार प्रशासक यांच्याकडे राहिल.

**जा. क्र. : ३०३७/२०२६/२७**
**दिनांक : ५/६/२०२६**

**सही/-**
**श्री. गोविंद शिद**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रुप ग्रामपंचायत ऐनघर**
**ता. रोहा, जि. रायगड**

**सही/-**
**सौ. कलावती राजेंद्र कोकळे**
**प्रशासक**
**ग्रुप ग्रामपंचायत ऐनघर**
**ता. रोहा, जि. रायगड**


# पावसाळापूर्व सुक्या मच्छीला मोठी मागणी

## रेवदंडा पंचक्रोशीत पर्यटकांचा विशेष ओढा; सुके सोडे २००० रुपये किलो



**रेवदंडा : प्रतिनिधी**

पावसाळापूर्व काळात सुक्या मच्छीला मोठी मागणी आहे. पावसाळा जवळ आला की समुद्र खवळतो आणि मासेमारी बंद होते. त्यामुळे रेवदंडा पंचक्रोशीतील घराघरात वर्षभरासाठी सुकी मच्छी साठवण्याची लगबग सुरू झाली आहे.

बाजारात सध्या सुके बोंबील, सुके पापलेट, सुके सोडे, सुकी जवळा, सुकी अंबाडी, सुकी वाकटी, सुके मांदेली, सुकी सुकट, सुके हलवे, सुकी तारली, सुके बोर्बिल, सुकी बांगडी अशा विविध प्रकारच्या सुकी मच्छीची रेलचेल आहे. प्रत्येक मच्छीचा स्वतःचा खवय्ये वर्ग आहे.मुंबई, ठाणे, पुणे आदी शहरातून आलेल्या पर्यटकांची मागणी पावसाळापूर्व काळात मोठी आहे. रेवदंडा, काशीद, मुरूडच्या किनाऱ्यावर फिरायला येणारे पर्यटक या सर्व प्रकारची सुकी मच्छी आवडीने खरेदी करत आहेत. हमरस्त्यालगत कोळी भगिनींनी लावलेल्या स्टॉलवर गाड्या थांबवून थेट खरेदी केली जाते. यंदा सुके सोडे म्हणजेच कोळंबी सोंडे याचा भाव ₹२००० किलोपर्यंत पोहोचला आहे.

**इतर दर**

सुके पापलेट : ₹१८००-२२००/किलो, सुके बोंबील : ₹८००-१०००/किलो, सुकी अंबाडी : ₹६००/किलो, सुकी वाकटी, मांदेली, बोर्बिल : ₹८००-१०००/किलो, सुकट, जवळा, तारली : ₹३५०-५००/किलो, सुके हलवे, बांगडी : ₹७००-९००/किलो. मागील वर्षीच्या तुलनेत १०-१५% भाव वाढले आहेत. तरीही पर्यटक हात आखडता न घेता खरेदी करत आहेत.

**थेट खरेदीला पसंती**

रेवदंडा पंचक्रोशीतील सुकी मच्छी विक्रेते ताराचंद कोंडे यांनी सांगितले, "मे महिना सुरू झाला की मुंबई-पुण्याहून पर्यटक थेट रस्त्यावर येऊन खरेदी करतात. लोक पावसाळ्यासाठी सोडे, पापलेट, बोंबील, जवळा असं मिक्स २-३ किलो घेऊन जातात. विविध सुकी मच्छीची नावे सांगून ग्राहक मागणी करतात. पर्यटन वाढल्याने आमच्या व्यवसायाला चांगली गती मिळाली आहे." दरम्यान, कोळी महिलांच्या चेहऱ्यावरही समाधान दिसत आहे. पावसाळा सुरू झाला की सुक्या मच्छीचे भाव अजून वाढण्याची शक्यता आहे.

# मोरबे धरणात १५ टक्केच जलसाठा

## महापौरांकडून जलकुंभांची पाहणी, काटकसरीचे आवाहन

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबईला पाणीपुरवठा करणाऱ्या मोरबे धरणाची पाणी पातळी आता ७१ मीटरवर आली असून वापरण्यायोग्य १५.२४ टक्के जलसाठा शिल्लक आहे. हा साठा जुलै अखेरपर्यंत पुरवठा करता येईल, अशी माहिती महापौर सुजाता पाटील यांनी दिली. दरम्यान, शहरात पाण्याच्या रंगबदलाच्या तक्रारी वाढल्याने महापौर व उपमहापौरांनी नेरूळ जुईनगर विभागातील जल गुणवत्ता तपासणीची पाहणी केली. महापौर सुजाता पाटील व उपमहापौर दशरथ भगत यांनी नेरूळ जुईनगर विभागातील नगरसेवकांसह सेक्टर ९ येथील पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृतीभवनामध्ये नेरूळ विभागातील पाणी नमुने तपासणीची पाहणी केली.



मागील काही दिवसांत पाण्याच्या रंगबदलाच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या होत्या. पाणीपुरवठा विभागाने नागरिकांपर्यंत पोहचून त्यांच्या घरातील पाणी नमुने तपासून ते पिण्यायोग्य असल्याचे दाखवून आश्वस्त करण्याचे काम केले. त्याबद्दल महापौरांसह सर्व लोकप्रतिनिधींनी अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे आणि पाणीपुरवठा विभागातील कर्मचाऱ्यांच्या तत्परतेची प्रशंसा केली.१३ ते १५ मे या कालावधीत शटडाऊन घेतल्यानंतर पाणीपुरवठा पूर्ववत सुरू झाल्यानंतर सर्वच विभागांतून पाणी गढूळ असल्याच्या तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त होऊ लागल्या. त्यानंतर महापौरांनी उपमहापौरांसह मोरबे धरणापासून भोकरपाडा जलशुद्धीकरण केंद्र, मुख्य जलकुंभ, स्काडा प्रणाली अशा सर्व पाणीपुरवठा व्यवस्थेची सविस्तर पाहणी केली.

पाणीपुरवठा विभागास आदेश देऊन सर्व विभागात मोठ्या संख्येने जलनमुने तपासण्यात आले. कोपरखैरणेपासून सुरुवात करीत स्थानिक लोकप्रतिनिधींसह प्रत्येक विभागात जाऊन तेथील पाणी गुणवत्ता तपासणीची पाहणीस सुरुवात केली आहे. यावेळी ब प्रभाग समिती अध्यक्ष रूपाली भगत, क्रीडा समिती सभापती गिरीश म्हात्रे, नगरसेवक प्रदीप गवस, सुरेश शेट्टी, माधुरी सुतार, मीरा पाटील, स्वप्ना गावडे, प्रिती भोपी, डॉ. प्रणाली पाटील तसेच अतिरिक्त शहर अभियंता अरविंद शिंदे, कार्यकारी अभियंता शंकर जाधव व संतोष उनवणे उपस्थित होते. शटडाऊननंतर गढूळ पाण्याचा रंग दिवसागणिक फिकट होत आता पूर्ववत झाल्याचे नागरिकांनी सांगितले. तक्रारीसाठी नवी मुंबई पालिकेने जाहीर केलेल्या १८००२२२३०९ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महापौरांनी केले.

सध्या हवेतील उष्मा वाढला आहे. मोरबे धरणातील १५.२४ टक्के जलसाठा जुलै अखेरपर्यंत पुरवठा करता येईल, असे महापौरांनी सांगितले. यावर्षी अल निनोच्या प्रभावामुळे पाऊसही नेहमीपेक्षा कमी पडेल असा हवामान खात्याने अंदाज वर्तवलेला आहे. त्यामुळे असलेल्या पाण्याचा काळजीपूर्वक वापर करणे अत्यंत गरजेचे असून नागरिकांनी पाण्याचा अनावश्यक वापर व अपव्यय टाळावा, असे आवाहन महापौरांनी केले.

यावेळी नगरसेवकांनी जुन्या झालेल्या पाईप लाईनला छिद्रे पडल्याने काही ठिकाणी त्या गटारातून गेलेल्या असल्यास त्यात दूषित पाणी शिरते. त्यामुळे जलवाहिन्या नव्या टाकाव्यात, अशी मागणी केली. विशेषतः गावठाण भागात तसेच एलआयजी आणि झोपडपट्टी भागात हा प्रश्न उद्‌भवतो. याबाबत महापौरांनी रस्ते व गटारांची नवीन कामे करताना गटाराच्या बाजूला पाण्याच्या पाईपलाईनसाठी लहान आकाराचा स्वतंत्र डक्ट बनवावा, अशी सूचना केली. पाण्याची वास्तव स्थिती जाणून घेण्यासाठी सर्व विभागांमधील पाणी नमुन्यांची तपासणी करण्यासाठी मोहीम हाती घेतल्याची माहिती देत शास्त्रोक्त तपासणीअंती पाणी पिण्यायोग्य असल्याचे सर्व ठिकाणी निदर्शनास आले आहे. तरीही जलनमुने तपासण्या सुरू राहणार असल्याचे महापौर सुजाता पाटील यांनी स्पष्ट केले.

# भारत विकास परिषदेतर्फे ग्रीन व्हॅली पार्कमध्ये वृक्षारोपण

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त भारत विकास परिषदेच्या राणी दुर्गावती शाखा (खारघर-नेरुळ) यांच्या वतीने बेलापूर येथील ग्रीन व्हॅली पार्कमध्ये वृक्षारोपण कार्यक्रम उत्साहात पार पडला. या कार्यक्रमाला बेलापूरचे नगरसेवक डॉ. जयाजी नाथ आणि नगरसेविका स्वाती गुरखे यांच्यासह भारत विकास परिषदेचे पदाधिकारी, विविध सामाजिक संस्थांचे सदस्य, शाळा-महाविद्यालयातील विद्यार्थी तसेच पर्यावरणप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हरियाणा वेल्फेअर असोसिएशन, ग्रीन व्हॅली वॉकर्स असोसिएशन, पुनर्वसु फाउंडेशन आणि इतर संस्थांच्या सदस्यांनीही उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. कार्यक्रमासाठी आवश्यक रोपे उपलब्ध करून देणे तसेच खड्डे खोदण्याच्या कामात डॉ. जयाजी नाथ यांनी सहकार्य केले. वंदे मातरम्‌ने कार्यक्रमाची सुरुवात झाली. संस्थेचे संघटन मंत्री जगदीशचंद्र व्यास यांनी देशभक्तीपर गीतांच्या माध्यमातून वातावरण भारावून टाकले. यानंतर डॉ. अशोक वशिष्ठ यांनी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व विशद करत उपस्थितांना पर्यावरण संरक्षणाची शपथ दिली.




यावेळी आवळा, जांभूळ, पेरू, सीताफळ आदी फळझाडांची लागवड करण्यात आली. या वृक्षांमुळे भविष्यात ग्रीन व्हॅली पार्कमध्ये पक्ष्यांचे वास्तव्य वाढण्यास मदत होणार असल्याचे सांगण्यात आले.सिडकोने विकसित केलेले सुमारे २५० हेक्टर क्षेत्रफळाचे ग्रीन व्हॅली पार्क हजारो वृक्ष, वेली, विविध पक्षी आणि अन्य जीवसृष्टीने समृद्ध असून, दररोज शेकडो नागरिक येथे सकाळ-संध्याकाळ फिरण्यासाठी येत असतात. कार्यक्रमाचे संयोजन संस्थेच्या पर्यावरण संयोजिका व कवयित्री मीनू मदान यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी शाखाध्यक्षा अलका रावत यांनी उपस्थितांचे आभार मानले.

# नवी मुंबईत पर्यावरण दिनी बीज मोदकांचे वाटप

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त जयश्री फाऊंडेशन, नॅव्हिटेरा कन्सल्टंट्स प्रा. लि. यांच्या सहकार्याने व नवी मुंबई महानगरपालिकेच्या पाठिंब्याने ज्वेल्स ऑफ नवी मुंबई येथे वृक्षारोपण व बीज मोदक वितरण करण्यात आले. या उपक्रमाचा उद्देश पर्यावरण संवर्धनाबाबत जनजागृती करणे, हरित क्षेत्र वाढविणे आणि नागरिकांचा पर्यावरण संरक्षणामध्ये सहभाग वाढविणे हा होता.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून महापौर सुजाता पाटील उपस्थित होत्या. क्रीडा, सांस्कृतिक व युवा विकास

### ५०हून अधिक वृक्षांचे रोपण

समितीचे सभापती गिरीश म्हात्रे, महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापती रुपाली भगत, स्वप्ना गावडे, अभिजित देसाई, विशाल विचारे, प्रीती भोपी, सचिन लवटे, धर्मेश बरई, छाया तारळेकर, सिद्धी राणे, डॉ. भागवत, वैभव जाधव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. या उपक्रमांतर्गत ५० हून अधिक वृक्षांचे रोपण करण्यात आले. नागरिक, स्वयंसेवक, सामाजिक कार्यकर्ते आणि पर्यावरणप्रेमींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. कार्यक्रमातील विशेष आकर्षण म्हणून उपस्थित नागरिक, मान्यवर आणि सहभागी यांना बीज मोदकांचे वितरण करण्यात आले.

यावेळी महापौर सुजाता पाटील म्हणाल्या की, जागतिक पर्यावरण दिन पर्यावरण संवर्धनाची सामूहिक जबाबदारी अधोरेखित करतो. वृक्षारोपण हे पर्यावरण संरक्षणासाठी सर्वात प्रभावी माध्यमांपैकी एक आहे. बीज मोदक वितरण हा अभिनव उपक्रम असून त्याद्वारे नागरिकांना पर्यावरण संवर्धनासाठी सक्रिय सहभाग घेण्याची प्रेरणा मिळेल. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी पर्यावरण संवर्धनासाठी कार्य करण्याची सामूहिक शपथ घेतली.

## सलूनमध्ये महिलेचा विनयभंग

**नवीन पनवेल :** खारघर सेक्टर २ येथील सीएमसी सलूनमध्ये हेअर स्पा करण्यासाठी गेलेल्या ३४ वर्षीय महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी आरोपी समीरविरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील महिला ही ४ जून रोजी सीएमसी सलून सेक्टर २, खारघर या ठिकाणी हेअर स्पा करण्यासाठी गेल्या. यावेळी समीरने पीडित महिलेच्या चेहऱ्यावर स्पा क्रीम लावली. त्यानंतर त्याने महिलेच्या ओठाचा किस घेतला. यावेळी त्या महिलेने त्याला पेमेंट केले आणि सदरची घटना बहिणीला फोन करून सांगितली. त्यानंतर समीरने त्यांना त्यांचे पैसे रिटर्न केले आणि सॉरी मेसेज केला. पीडित महिलेच्या पतीने खारघर पोलीस ठाण्यात आरोपी समीरविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांनी समीरला ताब्यात घेतले आहे.

# भाजप नेते बाळासाहेब पाटील यांच्या वाढदिवसानिमित्त कार्यक्रम

**पनवेल : वार्ताहर**



भारतीय जनता पक्षाचे ज्येष्ठ नेते, माजी कोकण म्हाडा अध्यक्ष तथा विधान परिषद सदस्य आमदार विक्रांत पाटील यांचे पिताश्री बाळासाहेब पाटील यांचा ७ जून रोजी वाढदिवस साजरा होत आहे. यंदाच्या वाढदिवसानिमित्त बाळासाहेब पाटील यांच्या कार्यकर्ते व सहकाऱ्यांच्या वतीने रक्तदान शिबिर, छत्री व चष्मे वाटप, माता-भगिनींसाठी साडीवाटप, वृक्षारोपण, विद्यार्थ्यांना वह्यावाटप, मर्दानी खेळ, वृद्धाश्रमात भोजन तसेच हेल्मेट वाटप अशा विविध समाजोपयोगी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

गेली चार दशके भाजप संघटन, सामाजिक कार्य आणि सहकार क्षेत्रात त्यांनी उल्लेखनीय योगदान दिले आहे. स्वातंत्र्यसैनिक स्व. ज्ञानदेव ब. पाटील यांचे सुपुत्र असलेल्या बाळासाहेब पाटील यांनी भारतीय जनता पक्षाचे पनवेल शहर उपाध्यक्ष, शहराध्यक्ष, रायगड जिल्हाध्यक्ष, महाराष्ट्र प्रदेश कार्यकारिणी सदस्य तसेच कोकण म्हाडा अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) अशा विविध जबाबदाऱ्या समर्थपणे सांभाळल्या आहेत.

पक्षवाढीसाठी त्यांनी सातत्याने परिश्रम घेत मुंबई, नवी मुंबई, रायगड, उल्हासनगर, कल्याणसह अनेक निवडणुकांमध्ये संघटनात्मक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या. संपूर्ण रायगड जिल्ह्यात भाजपाचा भगवा झेंडा फडकविण्यात त्यांचे मोलाचे योगदान आहे. राजकारणासोबतच सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा आणि सांस्कृतिक क्षेत्रातही त्यांनी विविध संस्थांच्या माध्यमातून भरीव कार्य केले आहे. सहकार क्षेत्रात पनवेल को-ऑपरेटिव्ह अर्बन बँकेचे सात वर्षे चेअरमन म्हणूनही त्यांनी यशस्वी नेतृत्व केले. जनसेवा, संघटन कौशल्य आणि कार्यकर्त्यांशी असलेली आत्मियता यामुळे बाळासाहेब पाटील यांनी राजकीय व सामाजिक क्षेत्रात वेगळी छाप निर्माण केली आहे.

७ जून रोजी सायंकाळी ६ ते ९ या वेळेत रॉयल गार्डन बँक्वेट हॉल, साईनगर, पनवेल येथे अभीष्टचिंतन सोहळ्यासह संगीत कार्यक्रम व स्नेहभोजनाचे आयोजन युवा प्रतिष्ठानच्या वतीने करण्यात आले आहे. या कार्यक्रमास उपस्थित राहून शुभेच्छा द्याव्यात, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# 'लीव्हज् अ मार्क'मधून मँग्रोव्ह संवर्धनाला हातभार

## ४० किलो प्लास्टिक संकलित, २४०० नागरिकांचा सहभाग

**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने विविध उपक्रम राबविण्यात येत असून प्लास्टिकमुक्त नवी मुंबई संकल्पनेसाठी प्रोजेक्ट मुंबई या संस्थेच्या व माईंडस्पेस रिटल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने ऐरोली येथील माईंडस्पेस बिझनेस पार्कमध्ये 'लीव्हज् अ मार्क' हा जनजागृतीपर अभिनव उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात आला. या उपक्रमातून नवी मुंबईतील खारफुटी (मँग्रोव्ह) परिसंस्थेचे महत्त्व आणि प्लास्टिक प्रदूषणामुळे होणाऱ्या घातक परिणामांविषयी जागरूकता निर्माण करण्यात आली.

'नवी मुंबई प्लास्टिक आणि ई-वेस्ट रिसायक्लोथॉन' उपक्रमांतर्गत आयोजित या मोहिमेत २४०० हून अधिक



नागरिक, कर्मचारी आणि विविध संस्थांच्या प्रतिनिधींनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. एका ३२ फूट x ४८ फूट आकाराच्या भव्य कॅनव्हासवर नागरिकांच्या पाऊलखुणांद्वारे मँग्रोव्ह परिसंस्थेचे चित्र साकारण्यात आले. हिरव्या व निळ्या रंगांच्या मानवी पाऊलखुणांनी मँग्रोव्हची झाडे व जलमार्गांचे प्रतिकात्मक लक्षवेधी चित्रण करण्यात आले. मोहिमेमध्ये २४०० हून अधिक प्लास्टिकच्या बाटल्या आणि कंटेनरचे संकलन करण्यात आले. त्याचप्रमाणे साधारणतः ४० किलो प्लास्टिक कचरा पुनर्वापरासाठी वळविण्यात आला.

उपलब्ध वैज्ञानिक अभ्यासांच्या आधारे या प्रयत्नामुळे ठाणे खाडी परिसरातील अंदाजे २८० मँग्रोव्ह वृक्षांवरील प्लास्टिकचा संभाव्य ताण कमी होण्यास मदत होणार आहे. संकलित प्लास्टिक प्रोजेक्ट मुंबई संस्थेकडे सुपूर्द करण्यात आले असून त्यापासून महानगरपालिका शाळांतील विद्यार्थ्यांसाठी बाके तयार करण्यात येत आहेत. या उपक्रमात पर्यावरणपूरक आणि पुनर्वापरित साहित्याचाही वापर करण्यात आला. नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी या उपक्रमाची प्रशंसा करीत नागरिकांच्या प्रत्यक्ष सहभागातून हा उपक्रम राबविला गेला असल्याने त्यामध्ये नागरिकांच्या पर्यावरण जागरुकतेचे प्रतिबिंब पडले असल्याचे सांगितले.

नागरिक, प्रशासन आणि उद्योग क्षेत्र यांच्या एकत्रित सहभागातून पर्यावरण संवर्धनासाठी अशा उपक्रमांची आवश्यकता त्यांनी अधोरेखित केली.माईंडस्पेस रिटल इस्टेट इन्व्हेस्टमेंट ट्रस्टचे मुख्य कार्यकारी अधिकारी तथा व्यवस्थापकीय संचालक रमेश नायर यांनी भौतिक विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा समतोल साधण्याच्या संस्थेच्या बांधिलकीवर भर दिला. प्रोजेक्ट मुंबईचे मुख्य कार्यकारी अधिकारी व संस्थापक विश्वस्त शिशिर जोशी यांनी प्लास्टिक व्यवस्थापन करणे ही प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे सांगत या उपक्रमामुळे मँग्रोव्ह संवर्धनाबाबत व्यापक जनजागृती झाल्याचे नमूद केले.

आगामी काळात मँग्रोव्ह स्वच्छता मोहीम, पुनर्वापरित प्लास्टिकपासून सामुदायिक बाग उभारणी तसेच शाळा, महाविद्यालये व गृहनिर्माण संस्थांमध्ये पर्यावरणविषयक जनजागृतीपर उपक्रम राबविण्यात येत आहेत.

# एनएमआयए प्रकल्पग्रस्तांसाठी मोफत कौशल्य प्रशिक्षण

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ (एनएमआयए) प्रकल्पग्रस्त युवक-युवतींना विमानतळ व विमानवाहतूक क्षेत्रातील रोजगारासाठी सक्षम करण्याच्या उद्देशाने सिडकोने MSSDS (कौशल्य विकास विभाग, महाराष्ट्र राज्य) यांच्या समन्वयातून विशेष कौशल्य विकास प्रशिक्षण उपक्रम हाती घेतला आहे. या उपक्रमांतर्गत मेसर्स विप्रा स्किल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड यांच्या माध्यमातून विमानतळ क्षेत्राशी संबंधित विविध रोजगाराभिमुख अभ्यासक्रमांचे प्रशिक्षण दिले जाणार आहे.

प्रकल्पग्रस्त युवकांना आवश्यक कौशल्ये प्रदान करून त्यांची रोजगारक्षमता वाढविणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. ग्राहक सेवा कार्यकारी,

### विमानतळ क्षेत्रातील नोकऱ्यांसाठी युवकांना दिशा

एअरलाइन्स बॅगेज हँडलर, विमानतळ टर्मिनल ऑपरेशन्स मॅनेजर, विमानतळ कार्गो ऑपरेशन्स तसेच एअरलाइन्स ग्राउंड स्टाफ या पदांसाठी प्रशिक्षण दिले जाणार आहे. सदर सर्व अभ्यासक्रमांचा कालावधी तीन महिन्यांचा असून प्रकल्पग्रस्तांसाठी हे प्रशिक्षण पूर्णपणे मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यानंतर निर्माण होणाऱ्या विविध रोजगार संधींसाठी स्थानिक युवकांना सक्षम करण्यास या उपक्रमाची मोठी मदत होणार आहे. मोठ्या पायाभूत प्रकल्पांमुळे निर्माण होणाऱ्या विकासाच्या संधींचा लाभ प्रकल्पग्रस्तांना मिळावा यासाठी सिडको सातत्याने प्रयत्नशील आहे. त्याचाच एक भाग म्हणून राबविण्यात येत असलेल्या या कौशल्य विकास उपक्रमामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या नव्या संधी उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

**नोंदणीसाठी संपर्क**

इच्छुक प्रकल्पग्रस्तांनी प्रशिक्षणासाठी नोंदणी करून अधिक माहितीसाठी मेसर्स विप्रा स्किल इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. १२, रोड क्र. २, सेक्टर-१, न्यू पनवेल पूर्व, पनवेल, नवी मुंबई ४१०२०६ येथे संपर्क साधावा. तसेच ७०२१७५२३२४ या मोबाइल क्रमांकावर किंवा mssdscidco@gmail.com या ई-मेलवर संपर्क साधता येईल.







महाड : छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३५२व्या शिवराज्याभिषेक दिनानिमित्त दुर्गराज रायगडावर इतिहास, परंपरा आणि शिवभक्तीचा अनोखा संगम अनुभवायला मिळाला. या सोहळ्यासाठी राज्याच्या कानाकोपऱ्यातून तसेच देशभरातून हजारो शिवप्रेमींनी उपस्थिती दर्शवली होती. यावेळी शिवभक्तांकडून छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयघोषाने संपूर्ण रायगड परिसर दुमदुमून गेला होता.

# सुट्ट्यांमध्ये श्रीवर्धन पर्यटकांनी गजबजले; समुद्रकिनाऱ्यांवर लगबग; व्यवसायाला पाठबळ



**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

कोकणातील निसर्गसौंदर्य, ऐतिहासिक वारसा आणि समुद्रकिनाऱ्यांची मोहिनी अनुभवण्यासाठी यंदाच्या सुट्ट्यांमध्ये हजारो पर्यटकांनी श्रीवर्धनकडे धाव घेतली. शनिवार-रविवारची सुट्टी आणि मे महिन्याच्या अखेरीस मिळालेल्या सलग सुट्ट्यांचा लाभ घेत पर्यटकांनी श्रीवर्धन अक्षरशः गजबजून टाकले. परिणामी शहरातील अनेक हॉटेल्स, रिसॉर्ट्स आणि होमस्टे "हाऊसफुल्ल" झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

पेशवेकालीन इतिहासाची साक्ष देणारे हे पर्यटनस्थळ आपल्या स्वच्छ, विस्तीर्ण आणि सुमारे तीन किलोमीटर लांबीच्या समुद्रकिनाऱ्यासाठी प्रसिद्ध आहे. सकाळपासून सायंकाळपर्यंत समुद्रकिनाऱ्यावर पर्यटकांची मोठी गर्दी दिसून आली. समुद्राच्या लाटांमध्ये खेळण्याचा आनंद, वाळूत आकर्षक किल्ले उभारणे, घोडागाडी आणि उंट सफारीचा अनुभव घेण्यासाठी पर्यटकांनी मोठी पसंती दर्शविली.

पर्यटकांच्या वाढत्या संख्येमुळे स्थानिक पर्यटन व्यवसायाला मोठी चालना मिळाली आहे. अनेक रिसॉर्ट्स, लॉज आणि होमस्टे मालकांनी आठवडाभर आधीच सर्व खोल्यांचे आरक्षण पूर्ण झाल्याचे सांगितले. स्थानिक वाहनचालक, फेरीवाले, मार्गदर्शक आणि लघु व्यावसायिकांनाही या पर्यटन हंगामाचा मोठा लाभ मिळाला.

खाद्यप्रेमी पर्यटकांनीही कोकणातील पारंपरिक चवींचा मनमुराद आस्वाद घेतला. उकडीचे मोदक, सोलकढी, फणसाची भाजी, कोकणी थाळी यांसह पापलेट, सुरमई, बांगडा आणि कोळंबी यांसारख्या ताज्या समुद्री खाद्यपदार्थांना विशेष मागणी होती. अनेक हॉटेल्स आणि खानावळींमध्ये जेवणासाठी प्रतीक्षा करावी लागल्याचे चित्र दिसून आले.

दरम्यान, पर्यटनामुळे स्थानिक गृहउद्योगांनाही नवसंजीवनी मिळाली आहे. आंबा पोळी, फणस पोळी, कोकम सरबत, आवळा सरबत, आमसूल, करवंदे, जांभुळे आणि हापूस आंबा यांसारख्या कोकणी उत्पादनांच्या विक्रीत मोठी वाढ झाली. विशेषतः महिलांनी चालविलेल्या गृहउद्योगांना पर्यटकांचा उत्तम प्रतिसाद मिळत असून त्यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत आहे.

## पेणमधील धोकादायक इमारतींना पालिकेची नोटीस

**पेण : प्रतिनिधी**

पेण शहरातील १४ इमारती या अत्यंत धोकादायक म्हणून निष्पन्न झाल्या असून जवळपास ३७ इमारतींची धोकादायक इमारती म्हणून नोंद करण्यात आली आहे. सदर इमारतींच्या अध्यक्ष, सोसायटी किंवा मालकांना तशा प्रकारच्या नोटीस जारी करण्यात आल्या आहेत.

पेण शहरात कोणकोणत्या इमारती धोकादायक आहेत वा अत्यंत धोकादायक आहेत याचा आढावा नुकताच बांधकाम विभागाच्या माध्यमातून घेण्यात आला आहे.त्यामध्ये ज्या इमारती धोकादायक स्थितीत आहेत त्यांची योग्य ती डागडुजी करून घेणे आणि अत्यंत धोकादायक इमारती आहेत त्यांनी त्या इमारतीमध्ये वास्तव्य न करता इतर ठिकाणी आपली वास्तव्याची व्यवस्था करावी अशा प्रकारच्या नोटीस पेण पालिकेने संबंधित इमारतीच्या मालक, सोसायटीधारक किंवा अध्यक्षांना जारी केल्या असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली.

दरवर्षीप्रमाणे पेण शहरातील इमारतींचा पावसाळ्यापूर्वीचा आढावा आम्ही घेतला असून अतिवृष्टीमुळे एखाद्या सदनिकेचे किंवा इमारतीचे अतिवृष्टीमुळे नुकसान होऊन जीवित हानी किंवा वित्त हानी होऊ नये यासाठी शहरातील घेतलेल्या आढाव्याप्रमाणे ज्या इमारती अत्यंत धोकादायक किंवा धोकादायक म्हणून जाहीर करण्यात आल्या आहेत त्यांनी दिलेल्या नोटीसीचे पालन करावे आणि तशा प्रकारचा अहवाल आमच्याकडे सादर करावा अशा सूचना दिल्या आहेत, त्यांनी त्या सूचनांचा पालन करून पालिकेला सहकार्य करावे, पालन न केल्यास एखादी दुर्घटना घडली तर पालिका प्रशासन जबाबदार राहणार नाही, अशी माहिती मुख्याधिकारी जीवन पाटील यांनी दिली.

## अजब योगायोग! ज्या तारखांना सुनील तटकरे खासदार झाले, त्याच तारखांना पुत्र अनिकेत तटकरे झाले आमदार!

**पाली : प्रतिनिधी**

राजकारणात विजय, पराभव आणि जनतेचा कौल हे नेहमीच चर्चेचे विषय असतात, मात्र तटकरे कुटुंबाच्या राजकीय प्रवासात घडलेला एक विलक्षण योगायोग सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. ज्यादिवशी सुनील तटकरे खासदार झाले, त्याच तारखांना अनिकेत तटकरे आमदार झाल्याचा दुर्मीळ योगायोग जुळून आला आहे.

अनिकेत तटकरे यांनी सोशल मीडियावर याबाबत भावना व्यक्त करत हा योगायोग केवळ तारखांचा नसून जनतेच्या विश्वासाचा आणि कार्यकर्त्यांच्या पाठबळाचा असल्याचे म्हटले आहे.

२४ मे २०१८ रोजी अनिकेत तटकरे यांना प्रथमच आमदार म्हणून जनतेची सेवा करण्याची संधी मिळाली. त्यानंतर अवघ्या वर्षभराने २४ मे २०१९ रोजी सुनील तटकरे प्रथमच लोकसभेवर निवडून गेले व खासदार झाले.



यानंतर पुन्हा एकदा इतिहासाची पुनरावृत्ती झाली. ४ जून २०२४ रोजी जनतेने सुनील तटकरे यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना दुसऱ्यांदा लोकसभेत पाठवले. त्यानंतर नेमक्या दोन वर्षांनी ४ जून २०२६ रोजी अनिकेत तटकरे यांना दुसऱ्यांदा महाराष्ट्र विधान परिषदेवर जाण्याची संधी मिळाली.


या अनोख्या योगायोगाबद्दल बोलताना अनिकेत तटकरे म्हणाले, "या योगायोगाकडे पाहताना मन नकळत भावूक होते. हा केवळ तारखांचा योग नाही, तर जनतेने दाखवलेल्या विश्वासाची, कार्यकर्त्यांनी दिलेल्या साथ-सहकार्याची आणि ज्येष्ठांच्या आशीर्वादाची साखळी आहे. काही गोष्टी आपण ठरवतो, काही गोष्टी नियती ठरवत असते. या क्षणी माझ्या मनात अभिमानापेक्षा कृतज्ञता अधिक आहे."

तटकरे कुटुंबाच्या राजकीय वाटचालीतील हा योगायोग केवळ तारखांचे साम्य नसून जनतेचा विश्वास, नाती आणि राजकीय परंपरेचा अनमोल ठेवा असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली आहे. त्यामुळे हा अनोखा योगायोग सध्या चर्चेचा विषय ठरत आहे.



**रसायनी : लोना इंडस्ट्रीजमध्ये जागतिक पर्यावरण दिन वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. यावेळी जपानचे प्रमुख पाहुणे तेरेडा हे उपक्रमात सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे एचआर मॅनेजर भगतकर, गुप्त, बर्गे, हांडे, खोत, दशरथ पाटील भुजाडे यांच्यासह कामगार कमिटीचे म्हात्रे, जगताप, कचरे, सेफ्टीचे चाळके, विजय पाटील, वर्तक बोराडे आदी उपस्थित होते.**

# किनारपट्टीचा विकास



पर्यटन आणि मच्छीमारांचा समतोल अलिबागच्या कुलाबा किल्ल्यापासून ते श्रीवर्धनच्या हरिहरेश्वरापर्यंत सुमारे २४० किलोमीटर लांबीची निसर्गरम्य किनारपट्टी लाभलेला रायगड जिल्हा हा खऱ्या अर्थाने 'महाराष्ट्राचा गोवा' आहे. पांढरीशुभ्र वाळू, नारळी-पोफळीच्या बागा, शांत समुद्र आणि ऐतिहासिक पार्श्वभूमी यामुळे दर वीकेंडला मुंबई, पुणे, नाशिक येथून हजारो पर्यटक इथे येतात. पर्यटनामुळे जिल्ह्याच्या अर्थकारणाला चालना मिळाली आहे.

हॉटेल, रिसॉर्ट, होम स्टे, वॉटर स्पोर्ट्स, वाहतूक यातून रोजगार निर्माण झाला आहे. पण या चंदेरी दुनियेची दुसरी बाजूही आहे. ती म्हणजे इथल्या मूळ निवासी असलेल्या कोळी, आगरी, भंडारी समाजाची, म्हणजेच पारंपरिक मच्छीमारांची. गेल्या दोन दशकांत किनारपट्टीवर मोठमोठे रिसॉर्ट्स, बंगले, सेकंड होम्स उभे राहिले. जमिनीचे भाव गगनाला भिडले. अनेक मच्छीमार बांधवांनी जमिनी विकल्या. आता परिस्थिती अशी आहे की त्यांना बोटी लावायला जागा उरली नाही. मासळी सुकवण्यासाठी, जाळी दुरुस्त करण्यासाठी मोकळी जागा नाही. समुद्रकिनारे 'खाजगी बीच' झाले आहेत. पर्यटकांच्या बोटी, जेट स्की यामुळे मच्छीमारी क्षेत्रात अडथळे येतात. एलईडी लाईटच्या मासेमारीमुळे पारंपरिक मच्छीमारांचे नुकसान होत आहे. पर्यटन वाढले, पण त्याचा थेट फायदा स्थानिक मच्छीमार समाजाला किती झाला, हा संशोधनाचा विषय आहे. विकास करताना समतोल साधणे महत्त्वाचे आहे. पर्यटन हवे, पण ते स्थानिकांच्या पोटावर पाय देऊन नको. यासाठी शासनाने 'बीच शॅक पॉलिसी' अधिक प्रभावीपणे राबवावी. गोव्याच्या धर्तीवर किनाऱ्यावर तात्पुरते शॅक उभारण्याची परवानगी देताना स्थानिक मच्छीमार सहकारी संस्थांना ८० टक्के प्राधान्य द्यावे. त्यांना प्रशिक्षण, कर्ज, परवाना मिळवून देण्यासाठी एक खिडकी योजना राबवावी. जेणेकरून पर्यटकांना सेवा देणारा मच्छीमार बांधवच असेल. यातून त्याला मासेमारीसोबत जोडधंदा मिळेल. सी-फूड हे कोकणचे वैशिष्ट्य आहे. प्रत्येक समुद्रकिनाऱ्यावर 'कोळी फूड फेस्टिवल' आयोजित करावे. सुरमई फ्राय, बोंबील फ्राय, करली, पापलेट, कोलंबी, तिसऱ्या, कालवं यांसारखे पारंपरिक पदार्थ पर्यटकांना चाखायला मिळतील. महिला बचत गटांना यात सहभागी करून घ्यावे. 'स्कूबा डायव्हिंग', 'स्नॉर्कलिंग', 'डॉल्फिन सफारी' यांसारख्या जलक्रीडा प्रकारांचे प्रशिक्षण स्थानिक तरुणांना देऊन त्यांनाच परवाने द्यावेत. श्रीवर्धन-हरिहरेश्वर-दिवेआगार हा पट्टा अत्यंत सुंदर आहे. हा परिसर 'ब्लू फ्लॅग बीच' म्हणून विकसित होऊ शकतो. त्यासाठी स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, सांडपाणी प्रक्रिया, सुरक्षितता, प्रथमोपचार केंद्र या सर्व आंतरराष्ट्रीय मानकांची पूर्तता करावी लागेल. यात स्थानिक ग्रामपंचायती आणि तरुणांचा सहभाग महत्त्वाचा आहे. समुद्र किनारा स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी फक्त प्रशासनाची नाही, तर आपली सर्वांची आहे. पारंपरिक मासेमारी टिकवण्यासाठी शासनाने मदत केली पाहिजे. आधुनिक बोटी, जीपीएस यंत्रणा, फिश फाईंडर, कोल्ड स्टोरेज, आईस प्लांट यासाठी अनुदान वाढवावे. डिझेलवरील कर सवलत द्यावी. मच्छीमारांसाठी स्वतंत्र जेटी बांधाव्यात. मासळी बाजार आधुनिक पद्धतीचे असावेत. सुक्या माशांना चांगला भाव मिळावा म्हणून पॅकेजिंग आणि ब्रँडिंग करावे. 'रायगडचा सुकट' या नावाने तो ऑनलाइन विकला जाऊ शकतो. पर्यटक आणि मच्छीमार यांच्यात संवाद घडवून आणावा. पर्यटकांना 'मच्छीमारी सहली'वर घेऊन जावे. त्यांना जाळी टाकणे, मासे पकडणे हा अनुभव द्यावा. यातून पर्यटकांना नवीन अनुभव मिळेल आणि मच्छीमारांना उत्पन्न. किनारी रस्त्याचे, म्हणजेच सागरी महामार्गाचे काम वेगाने पूर्ण करावे. यामुळे एका किनाऱ्यावरून दुसऱ्या किनाऱ्यावर जाणे सोपे होईल आणि संपूर्ण किनारपट्टी पर्यटनासाठी खुली होईल. थोडक्यात, रायगडच्या किनारपट्टीचा विकास करताना 'माणूस' केंद्रबिंदू ठेवावा लागेल. इथला मच्छीमार जगला तरच इथली संस्कृती जगेल. पर्यटन आणि पारंपरिक व्यवसाय यांची सांगड घातली तरच शाश्वत विकास होईल. नाहीतर आपण गोव्यासारख्या चुका करू आणि पुढच्या पिढीला फक्त काँक्रीटचे जंगल देऊ. समतोल साधला तर रायगडची किनारपट्टी जगाच्या नकाशावर नक्कीच झळकेल. (साभार : इंटरनेट)

## महाडमधील पाण्याचे संकट लवकरच दूर होणार -मंत्री गोगावले

**महाड : प्रतिनिधी**

महाड शहरावर निर्माण झालेल्या भीषण पाणीटंचाईच्या संकटावर मात करण्यासाठी राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन व खारभूमी विकासमंत्री ना.भरतशेठ गोगावले यांनी प्रत्यक्ष तालुक्यातील नडगाव जवळ असलेल्या जलस्रोताची प्रत्यक्ष पाहणी केली. त्या ठिकाणी असलेल्या पाणीसाठ्याचा उपयोग महाड शहरातील टंचाईग्रस्त भागाला करण्यात यावा यासाठी पर्यायी व्यवस्था तातडीने करण्यात यावी असे स्पष्ट निर्देश ना. गोगावले यांनी दिले. शहरातील पाणीटंचाई वर तातडीने उपाययोजना करण्यासाठी घेण्यात आलेल्या आढावा बैठकीमध्ये त्यांनी वरील आदेश दिले.

महाड शहराच्या बहुतांश भागाला पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणारे कोथुर्डे धरणातील पाण्याची पातळी पूर्णपणे खालावल्याने त्या धरणातून पाणीपुरवठा बंद झाला आहे. महाड शहराला गंभीर पाणीटंचाईचे संकट उभे राहिले आहे. या पार्श्वभूमीवर ना. भरत गोगावले यांनी नडगाव ग्रामपंचायत हद्दीतील दगडखाण उत्खननामुळे निर्माण झालेल्या तीन मोठ्या जलसाठ्यांची प्रत्यक्ष पाहणी केली.



या जलस्रोतांमधील उपलब्ध पाणी महाड शहरातील करंजखोल येथील जलशुद्धीकरण केंद्रापर्यंत पोहोचविण्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभारण्यात यावी याची तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले. यानंतर महाड नगर परिषद कार्यालयात पाणीटंचाईच्या अनुषंगाने आढावा बैठक घेण्यात आली.बैठकीत शहरातील नागरिकांना पिण्याच्या पाण्याची कमतरता भासू नये यासाठी विविध पर्यायी जलस्रोतांचा वापर, तात्पुरत्या पाणीपुरवठा योजना, आवश्यक यांत्रिक सुविधा तसेच जलसाठ्यांचे प्रभावी व्यवस्थापन याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली.

पाहणी दौऱ्यावेळी महाड शहराचे नगराध्यक्ष सुनील कविस्कर, महाड नगर परिषदेचे मुख्याधिकारी श्री. कोळेकर, विविध विभागांचे अभियंते व कर्मचारी, रायगड जिल्हा प्रवक्ते नितीन पावले, शहर प्रमुख डॉ. चेतन सुर्वे, गटनेते ॲड. निखिल शिंदे, संपर्क प्रमुख सिद्धेश पाटेकर, बांधकाम सभापती सुमित पवार, आरोग्य सभापती महेश शेडगे, नगरसेवक प्रमोद महाडिक, माजी नगरसेवक सुनील अगरवाल आदी उपस्थित होते.

## नैसर्गिक शेतीकडे शेतकऱ्यांचे पाऊल!

**माणगाव : प्रतिनिधी**

नैसर्गिक व सेंद्रिय शेतीच्या दिशेने वाटचाल करत कालवण गावातील तरुण शेतकरी आणि शेती क्षेत्रात नावीन्यपूर्ण प्रयोग करू इच्छिणाऱ्या शेतकऱ्यांनी एकत्र येऊन जैविक खत निर्मितीबाबत मार्गदर्शन शिबिराचे आयोजन केले. बुधवारी (दि. ३) आयोजित या उपक्रमात कृषी अधिकारी निलेश डोके व प्रदीप बांगर यांनी शेतकऱ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी जैविक खताची निर्मिती, त्याचा योग्य वापर, प्रसार आणि शेतीतील महत्त्व याबाबत सखोल माहिती देण्यात आली.



रासायनिक खतांच्या वाढत्या वापरामुळे जमिनीची सुपीकता कमी होत असताना, नैसर्गिक आणि जैविक शेती हा शाश्वत पर्याय ठरू शकतो, असे मत मार्गदर्शकांनी व्यक्त केले. तसेच जैविक खतामुळे उत्पादन खर्चात बचत होऊन जमिनीचे आरोग्य सुधारते व दर्जेदार उत्पादन मिळण्यास मदत होते, असेही त्यांनी सांगितले.भविष्यातील शेती अधिक सक्षम, पर्यावरणपूरक आणि आर्थिकदृष्ट्या फायदेशीर करण्यासाठी नैसर्गिक शेतीचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. याच अनुषंगाने कालवण येथील शेतकऱ्यांनी "काळभैरव शेतकरी गट, कालवण" या नावाने एकत्र येत सामूहिक शेती व नैसर्गिक शेतीच्या प्रसारासाठी पुढाकार घेतला आहे.

या उपक्रमामुळे गावातील शेतकऱ्यांमध्ये सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून शेती विकासासाठी एक नवी दिशा मिळाली आहे. या प्रसंगी कालवण गावातील प्रगतशील शेतकरी रोहिदास महादेव हर्णेकर, रणजीत विठोबा हर्णेकर तसेच गावातील अनेक शेतकरी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा प्रयत्न प्रेरणादायी ठरत आहे.

# श्रेयस अय्यर टी-२० संघाचा नवा कर्णधार

## सूर्यकुमार यादवला डच्चू! वैभव सूर्यवंशीला भारतीय संघात संधी



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारताच्या संघ निवडीबाबत मोठी घोषणा करण्यात आली असून श्रेयस अय्यर याची आयर्लंड आणि इंग्लंडविरुद्धच्या टी-२० मालिकांसाठी तसेच २०२६ आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय टी-२० संघाचा नवा कर्णधार म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. अजित आगरकर यांच्या नेतृत्वाखालील बीसीसीआय निवड समितीने शनिवारी (दि.६) याबाबतची घोषणा केली.

१५ वर्षीय युवा स्फोटक फलंदाज वैभव सूर्यवंशीचा तिन्ही संघात समावेश करण्यात आला आहे. विशेष म्हणजे टी-२० वर्ल्डकप स्पर्धा जिंकून देणाऱ्या सूर्यकुमार यादवला कर्णधारपदावरून काढल्यावर टी-२० संघातूनही बाहेरचा रस्ता दाखवण्यात आला आहे. विशेष म्हणजे तरुण खेळाडू तिलक वर्माला उपकर्णधार करून निवड समितीने मोठा संदेश दिला आहे.

आयर्लंड आणि इंग्लंडविरूद्धच्या टी-२० मालिकेत मुंबई इंडियन्सचे तीन दिग्गज खेळाडू सूर्यकुमार यादव, हार्दिक पांड्या आणि जसप्रीत बुमराह खेळणार नाहीयेत. सूर्यकुमारला डच्चू मिळाला आहे, तर हार्दिक आणि जसप्रीत बुमराह मालिकेसाठी उपलब्ध नाहीयेत. जरी तो आयर्लंड आणि इंग्लंड दौऱ्यासाठी उपलब्ध नसला तरी त्याची निवड एशियन गेम्ससाठीच्या भारतीय संघात करण्यात आली आहे.

**आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी भारतीय टी-२० संघ**

श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, टिळक वर्मा (उपकर्णधार), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, रवी बिश्नोई, जसप्रीत बुमराह, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, वैभव सूर्यवंशी.

**इंग्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघ**

श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, टिळक वर्मा (उपकर्णधार), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, वैभव सूर्यवंशी, रवी बिश्नोई, मोहम्मद सिराज, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव.

**आयर्लंड दौऱ्यासाठी भारतीय टी-२० संघ**

श्रेयस अय्यर (कर्णधार), अभिषेक शर्मा, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), शिवम दुबे, टिळक वर्मा (उपकर्णधार), नितीश कुमार रेड्डी, अक्षर पटेल, वॉशिंग्टन सुंदर, वरुण चक्रवर्ती, वैभव सूर्यवंशी, रवी बिश्नोई, मोहम्मद सिराज, हर्षित राणा, अर्शदीप सिंग, प्रिन्स यादव.

# प्रज्ञानंदने इतिहास रचला!

## नॉर्वे चेस स्पर्धा जिंकणारा ठरला पहिलाच भारतीय



**ओस्लो : वृत्तसंस्था**

बुद्धिबळ जगतातल्या नॉर्वे चेस या प्रतिष्ठेच्या स्पर्धेचे जेतेपद भारताचा ग्रँडमास्टर प्रज्ञानंद याने जिंकत इतिहास घडवला. या स्पर्धेचे जेतेपद पटकावणारा प्रज्ञानंद हा पहिलाच भारतीय खेळाडू आहे.

२० वर्षीय प्रज्ञानंदने शेवटच्या दिवसाची सुरुवात तिसऱ्या स्थानावरून केली. जर्मनीच्या विन्सेंट केमर याला नमवत प्रज्ञानंदने जेतेपदावर शिक्कामोर्तब केले. विजयासह प्रज्ञानंदने तीन गुण पटकावले आणि १८ गुणांसह गुणतालिकेत अव्वल स्थान राखत अजिंक्यपदावर नाव कोरले. स्पर्धेतील शेवटचे चार सामने जिंकण्याचा पराक्रमही त्याने केला.

जेतेपदापर्यंतच्या वाटचालीत प्रज्ञानंदने मॅग्नस कार्लसनला दोनदा नमवण्याची किमया केली. विश्वनाथन आनंद यांच्यानंतर कार्लसनला असे हरवणारा प्रज्ञानंद केवळ दुसराच भारतीय खेळाडू आहे. २०१३मध्ये नॉर्वे चेस स्पर्धेची सुरुवात झाली. भारतीय खेळाडूंनी सातत्याने या स्पर्धेच्या जेतेपदासाठी अविरत प्रयत्न केले, पण त्यांना यश मिळू शकले नाही. अमेरिकेच्या वेस्ली सो आणि अलिरेझा फिरुझा यांच्यातील सामना बरोबरीत सुटल्याचा फायदाही प्रज्ञाननंदाला मिळाला.

प्रज्ञानंदने नवव्या फेरीत भारतीय सहकारी आणि विद्यमान जगज्जेत्या दोम्माराजू गुकेशचा अवघ्या ३४ चालींत पराभव करत जेतेपदाच्या आशा पल्लवित केल्या होत्या. या विजयामुळे प्रज्ञानंदच्या खात्यात १५ गुण झाले होते. आघाडीवर असलेल्या वेस्ली सो याच्यापेक्षा केवळ अर्ध्या गुणाने मागे होता. जर्मनीच्या केमरला हरवत प्रज्ञाननंदाने बाजी मारली.

### महिलांमध्ये असाउबायेवा विजेती

महिला विभागात कझाकस्तानच्या बिबिसारा असाउबायेवा हिने अंतिम फेरीपूर्वीच विजेतेपद निश्चित केले. नवव्या फेरीत तिला ॲना मुझिचुककडून ‘आर्मागेडॉन’ डावात हार पत्करावी लागली, मात्र, पारंपरिक लढत बरोबरीत सोडवल्याने मिळालेल्या गुणाचा तिला फायदा झाला. भारतीय खेळाडूंमध्ये दिव्या देशमुखला चीनच्या झू जिनेरकडून पराभव पत्करावा लागला. कोनेरू हम्पी जगज्जेत्या ज्यू वेन्जूनकडून ‘आर्मागेडॉन’मध्ये पराभूत झाली.

# वैभव सूर्यवंशीची टीम इंडियात एन्ट्री!

■ मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडला



**मुंबई : प्रतिनिधी**

आयर्लंड आणि इंग्लंड मालिकेसह आगामी आशियाई क्रीडा स्पर्धेसाठी बीसीसीआयने शनिवारी (दि.६) भारतीय टी-२० संघाची घोषणा केली. श्रेयस अय्यरच्या नेतृत्वाखाली नव्या पर्वाची सुरुवात करताना निवडकर्त्यांनी आयपीएल हंगाम गाजवणाऱ्या १५ वर्षीय वैभव सूर्यवंशीला तिन्ही संघात स्थान दिले आहे.

भारतीय टी-२० संघात वर्णी लागताच वैभव सूर्यवंशीने क्रिकेटचा देव आणि महान क्रिकेटर सचिन तेंडुलकरचा विक्रम मोडीत काढला आहे. सर्वात कमी वयात भारतीय संघात निवड होण्याचा विक्रम आता त्याच्या नावे झाला आहे.

मास्टर ब्लास्टर सचिन तेंडुलकरची १९८९मध्ये पाकिस्तान दौऱ्यासाठी प्रथमच भारतीय संघात निवड झाली होती. त्यावेळी सचिन तेंडुलकर यांचे वय १६ वर्षे १८१ दिवस होते. त्याने १६ वर्षे २०५ दिवस वयात आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये पदार्पण करून इतिहास घडवला होता, मात्र आता अवघ्या १५व्या वर्षी वैभव सूर्यवंशीची भारतीय वरिष्ठ संघात निवड झाली असून त्याने सचिनचा हा विक्रम मागे टाकला आहे.

### आयपीएलमध्ये धमाकेदार शो

वैभव सूर्यवंशी याने आयपीएलच्या यंदाच्या हंगामात अक्षरशः धुमाकूळ घातला. क्रिकेट जगतातील नावाजलेल्या गोलंदाजांची धुलाई करत त्याने आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळण्यासाठी परिपक्व असल्याचे दाखवून दिले. आयपीएल स्पर्धेत त्याने ७७६ धावा करत ऑरेंज कॅप पटकावली. एवढेच नाही तर या कालावधीत त्याने अनेक अशक्यप्राय वाटणारे विक्रम मोडित काढत नवे विक्रम प्रस्थापित केल्याचेही पहायला मिळाले. त्याचे मोठे बक्षीस बीसीसीआयने त्याला दिले आहे.

# पहिला दिवस भारताचा; राहुल, गिलची शतके

## अफगाणिस्तानविरुद्ध कसोटीत ३ बाद ३६८ धावा



**न्यू चंदिगड : वृत्तसंस्था**

आयपीएल फायनल आटोपल्यानंतर काही दिवसात न्यू चंदीगढ इथे सुरू झालेल्या एकमेव कसोटीत भारतीय संघाने दमदार मजल मारली. टॉस जिंकून बॅटिंग घेतलेल्या भारतीय संघाने पहिल्या दिवसअखेर ३ बाद ३६८ धावा केल्या. केएल राहुल आणि शुबमन गिल यांच्या शतकी खेळी हे या दिवसाचे वैशिष्ट्य ठरले. सध्या गिल १०३, तर ऋषभ पंत ५० धावांवर खेळत आहेत.

केएल राहुलने तळपत्या उन्हात तंत्रकौशल्याचा वस्तुपाठ सादर करत खणखणीत शतकी खेळी साकारली. झिआऊर रहमानच्या गोलंदाजीवर दोन धावा घेत राहुलने कसोटीतील १२वे शतक झळकावले, मात्र पुढच्याच चेंडूवर ड्राईव्हचा फटका खेळण्याच्या प्रयत्नात तो बाद झाला. राहुलने ११ चौकारांसह १०० धावांची खेळी केली.

खरंतर भारताचा अनुभवी फलंदाज केएल राहुलला जीवदान मिळाले. झिआऊर रहमानच्या ऑफस्टंपबाहेरील चेंडूवर फटका मारण्याचा राहुलने प्रयत्न केला. चेंडू विकेटकीपरकडे गेला. विकेटकीपर आणि गोलंदाजाने अपील केले, मात्र पंचांनी बाद नसल्याचा कौल दिला. स्लिपमध्ये उभ्या असलेल्या रहमनुल्ला गुरबाझने बॅटने चेंडूची कड घेतल्याचे सांगितले, पण कर्णधार हशमतुल्ला शाहिदीने रिव्ह्यू न घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे राहुलला जीवदान मिळाले. वास्तविक रिप्लेत चेंडू बॅटला लागल्याचे स्पष्ट झाले.

दुसरीकडे लेगसाईडच्या दिशेने जाणारा चेंडू खेळण्याचा मोह यशस्वी जैस्वालला आवरला नाही आणि अफगाणिस्तानने पहिली विकेट पटकावली. मोहम्मद सलीमने सातत्याने लेगस्टंपवर मारा केला. त्याच्या सापळ्यात अखेर यशस्वी सापडला. त्याने २४ धावा केल्या.

यशस्वी जैस्वाल बाद झाल्यानंतर राहुलला साई सुदर्शनची साथ मिळाली. राहुल आणि सुदर्शन यांनी संयमी पद्धतीने फलंदाजी करत डाव सावरला. आयपीएलमध्ये जबरदस्त फॉर्मात असलेल्या सुदर्शनने हाच फॉर्म कायम राखला. त्याने खणखणीत अर्धशतक झळकावले. त्यानंतर तो ८१ धावा करून बाद झाला.

आयपीएल स्पर्धेत गुजरात टायटन्स संघासाठी खेळताना दमदार फॉर्मात असलेल्या शुबमन गिलनेही तोच फॉर्म कायम राखत खणखणीत शतक झळकावले. केएल राहुल आणि त्यानंतर ऋषभ पंत यांच्या साथीने गिलने मोठ्या भागीदाऱ्याही रचल्या.

सलग तीन महिने टी-२० क्रिकेट खेळल्यानंतर भारतीय संघ अफगाणिस्तानविरुद्ध एकमेव टेस्ट खेळत आहे.

# राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनची इक्विप्ड गटाची स्पर्धा उत्साहात




**मुंबई : प्रतिनिधी**

सिनियर, ज्युनिअर व सब ज्युनिअर, मास्टर्स पुरुष व महिला आणि अंध व गतिमंद दिव्यांग गटाची इक्विप्ड राज्य पॉवरलिफ्टिंग अजिंक्यपद स्पर्धा मुंबईत आयोजित करण्यात आली होती. वडाळा येथील ज्ञानेश्वर विद्यालयात झालेल्या या स्पर्धेत महाराष्ट्राच्या सर्वदूर जिल्ह्यातून अनेक नामवंत पुरुष व महिला खेळाडू सहभागी झाले होते.

स्पर्धेचे उद्घाटन क्रीडाप्रेमी आमदार कालिदास कोळंबकर यांच्या हस्ते झाले. स्पर्धेला विधान परिषदेचे आमदार प्रमोद जठार यांनीसुद्धा सदिच्छा भेट दिली. यावेळी महाराष्ट्र राज्य पॉवरलिफ्टिंग असोसिएशनच्या वतीने सचिव संजय सरदेसाई यांनी गदा देऊन गौरव केला. भविष्यात कोकण क्षेत्रातसुद्धा भव्य दिव्य पॉवरलिफ्टिंग स्पर्धा आयोजन करण्याची इच्छा आमदार जठार यांनी व्यक्त केली.

स्पर्धेच्या बक्षीस समारंभाला सायन हॉस्पिटलचे निवासी डॉ. ऋषिकेश मालावे, शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त अपर्णा घाटे, दिपाली जळगावकर, क्रीडा कार्यकारी अधिकारी प्रीती टेमघरे आदी उपस्थित होते. स्पर्धेचे वैशिष्ट्य म्हणजे जुन्या जाणत्या पुरुष व महिला खेळाडूंना आणि क्रीडा पत्रकारांना जीवन गौरव पुरस्काराने शाल, श्रीफळ, सन्मानपत्र आणि आणि एक छोट्या रकमेचा धनादेश देऊन सन्मानित करण्यात येते. त्यानुसार संघटनेचे माजी खेळाडू म्हणून यंदाचा महिला जीवनगौरव पुरस्कार हा शिवछत्रपती पुरस्कार प्राप्त आशा पुजारी (मुंबई) यांना आणि पुरुषांमध्ये राष्ट्रीय पंच, आंतरराष्ट्रीय पदक विजेते, महाराष्ट्र संघटनेचे माजी खजिनदार देवदत्त मनीबाई मार्तंड भोईर यांना देण्यात आला.

क्रीडा पत्रकारितेमध्ये ज्येष्ठ वार्ताहर आणि वृत्त मानसचे वृत्त संपादक नवनाथ दांडेकर यांना देण्यात आला. या स्पर्धेत सर्वोत्कृष्ट पंच म्हणून प्रथम क्रमांक जितेंद्र यादव (मुंबई), द्वितीय क्रमांक सुनील अडसूळ (मुंबई), तृतीय क्रमांक ऋत्विका सरदेसाई (मुंबई) यांना मान्यवरांच्या हस्ते चषक देण्यात आला.

**स्पर्धेतील किताब विजेते**

पुरुष गट : सब ज्युनिअर स्ट्राँग मॅन मुले-रौनक जितेकर (रायगड), ज्युनियर स्ट्राँग मॅन-ऋषिकेश तेली (सिंधुदुर्ग), सीनियर स्ट्राँग मॅन-योगेश गुंड (मुंबई शहर), मास्टर १स्ट्राँग मॅन-अजिनाथ शेखाडे (संभाजीनगर), मास्टर २ स्ट्राँग मॅन-प्रशांत जगताप (पुणे).

महिला गट : सब ज्युनिअर स्ट्राँग वूमन-गायत्री बडेकर (रायगड), ज्युनियर स्ट्राँग वूमन-शिफा शेख (मुंबई उपनगर), सीनियर स्ट्राँग वूमन-प्रेरणा साळवी (ठाणे), मास्टर१ स्ट्राँग वूमन-डॉ. शर्वरी इनामदार (पुणे), मास्टर २ स्ट्राँग वूमन-रुबी दास (मुंबई).

# प्रज्ञानंदच्या आईची भविष्यवाणी ठरली खरी!

**ओस्लो : वृत्तसंस्था**

भारतीय ग्रँडमास्टर आर प्रज्ञानंद याने नॉर्वे बुद्धिबळ स्पर्धेतील विजेतेपदासह नवा इतिहास रचला आहे. ही स्पर्धा जिंकणारा तो पहिला भारतीय बुद्धिबळपटू ठरला. ऐतिहासिक कामगिरीनंतर त्याने आईसोबत झालेल्या एका भावनिक संवादाचा खुलासा केला आहे.

२० वर्षीय चेन्नईच्या प्रज्ञानंदने शानदार पुनरागमन करत नॉर्वेची राजधानी ओस्लो येथे पार पडलेल्या स्पर्धेत भारताची मान पुन्हा एकदा अभिमानाने उंचावणारी कामगिरी करून दाखवली. भारतीय ग्रँडमास्टरने अंतिम फेरीत त्याने जर्मनीच्या व्हिन्सेंट कीमर याचा पराभव करत एक लाख डॉलर्सचे बक्षीस जिंकले. या विजेतेपदाच्या प्रवासात त्याने जगातील अव्वल खेळाडू मॅग्नस कार्लसन आणि भारताच्या डी. गुकेश यांना पराभूत केले.

या स्पर्धेतील प्रज्ञानंदचा प्रवास सुरुवातीपासून सोपा नव्हता. एका टप्प्यावर तो गुणतालिकेत अगदी तळाशी होता, पण दमदार कमबॅक करत त्याने जेतेपदावर नाव कोरले. ही स्पर्धा जिंकणारा पहिला भारतीय ठरल्यावर त्याने आई नागलक्ष्मी यांच्यासोबतच्या खास संवादाचा किस्सा शेअर केला.

प्रज्ञानंद म्हणाला की, १ जूनला अलिरेझाविरुद्धच्या सामन्यापूर्वी मी आईशी बोलत होतो. ती म्हटली, ‘नवा महिना सुरू झाला आहे, तू चांगला खेळशील.’ मला वाटलं, आई नेहमी असंच काहीतरी म्हणते, पण त्यानंतर मी सलग चार सामने जिंकलो. बहुतेक तिला काहीतरी माहिती होतं, असे म्हणत त्याने आईची भविष्यवाणी खरी ठरल्याची गोष्ट बोलून दाखवली.

प्रज्ञानंदने यशाचे आणखी एक कारणही सांगितले. तो म्हणाला, मी थोडे जलद खेळण्याचा निर्णय घेतला. प्रत्येक सामन्यात माझ्याकडे वेळेची आघाडी होती आणि सर्वोत्तम चाली खेळण्यातही मी यशस्वी ठरलो.






# अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेत रोहितच्या खेळण्याबाबतही प्रश्नचिन्ह



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेटचा दिग्गज फलंदाज विराट कोहली अफगाणिस्तानविरुद्धच्या आगामी वनडे मालिकेत खेळणार नसल्याचे स्पष्ट झाले आहे. टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतलेल्या कोहलीचे आता पूर्ण लक्ष २०२७च्या एकदिवसीय विश्वचषक स्पर्धेवर आहे, पण दुखापतीमुळे तो वनडे मालिकेला मुकणार आहे. अशातच अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेत रोहित शर्माच्या खेळण्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

बीसीसीआयचे मुख्य निवडकर्ता अजित आगरकर यांनी विराट कोहली अफगाणिस्तानविरुद्धच्या वनडे मालिकेत खेळणार नाही याची शनिवारी अधिकृत पुष्टी केली. त्याच्या जागी युवा सलामीवीर यशस्वी जैस्वाल याची भारतीय वनडे संघात निवड करण्यात आली आहे.

विराटच्या जागी बदली खेळाडूच्या रूपात यशस्वी जैस्वालची एन्ट्री झाल्यामुळे या वनडे मालिकेत रोहितच्या खेळण्यावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विराट सामन्याला मुकला तर मध्यफळीतील फलंदाजाला त्याच्या जागी संधी मिळेल, अशी अपेक्षा होती. या शर्यतीत ऋतुराज गायकवाडसह देवदत्त पडीक्कल व तिलक वर्मा ही नावे चर्चेत होती, पण सलामीवीर यशस्वीला विराटच्या जागी संघात दाखल करून घेतल्याने ही एन्ट्री हिटमॅनच्या चाहत्यांना धक्का देणारी ठरू शकते.

# मानव सुथारला टीम इंडियाची कॅप

**न्यू चंदिगड : वृत्तसंस्था**

अफगाणिस्तानविरुद्धच्या एकमेव टेस्टमध्ये भारतीय संघाने मानव सुथारला पदार्पण देण्याचा निर्णय घेतला. डोमेस्टिक क्रिकेटमध्ये सातत्यपूर्ण कामगिरी करणाऱ्या मानवला आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याचे कौशल्य दाखवण्याची संधी मिळणार आहे.

२०१०नंतर पहिल्यांदाच रवीचंद्रन अश्विन आणि रवींद्र जडेजा भारताच्या टेस्ट टीमचा भाग नाहीत. अश्विनने निवृत्ती घेतली आहे तर जडेजाला दुखापतीच्या कारणास्तव विश्रांती देण्यात आली आहे. अक्षर पटेलला या टेस्टसाठी संघातून वगळण्यात आले आहे. वॉशिंग्टन सुंदर आणि कुलदीप यादव यांच्याबरोबरीने मानव फिरकीची जबाबदारी सांभाळेल. २३ वर्षीय मानव हा राजस्थानमधील श्रीगंगानगरचा आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. -मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com